187

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग

# गौण वनौपज गोळा करणे तसेच त्यांची खरेदी-विक्री याबाबत सध्याचे धोरण

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

२००५-०६

# अ नु क्र म णि का



| अ.क्र. | तपशील | | पृष्ठे | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| १ | प्रस्तावना | | १ | |
| २. | प्रकरण क्रमांक १ | मूल्यमापन उद्देश | २ | |
| ३ | प्रकरण क्रमांक २ | कार्यपध्दती | ३ | ५ |
| ४. | प्रकरण क्रमांक ३ | गौण वनौपज एकाधिकार खरेदी योजना | ६ | १७ |
| ५. | प्रकरण क्रमांक ४ | क्षेत्रीय पाहणी व यंत्रणेकडून गोळा केलेल्या माहितीचे पृथःकरण | १८ | ३६ |
| ६. | प्रकरण क्रमांक ५ | अडचणी व शिफारशी | ३७ | ४१ |
| ७. | प्रकरण क्रमांक ६ | निष्कर्ष | ४२ | ४३ |
| | परिशिष्ट-१ | | ४४ | ४८ |
| | परिशिष्ट-२ | | ४९ | ५० |
| | परिशिष्ट-३ | | ५१ | ६४ |
| | परिशिष्ट- १ ते ३ | | ६५ | ७७ |

# प्रस्तावना

राज्याच्या विकासामध्ये वनांचा सहभाग अत्यंत महत्वाचा असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वन मोठया प्रमाणावर मदत करतात. राज्याच्या एकूण ३,०७,७१३ भौगोलिक क्षेत्रापैकी, वनाखालील क्षेत्र ६१,९३९ चौ.कि.मी.असून राज्यातील वनक्षेत्राचे प्रमाण २०.१३% आहे. वनक्षेत्रापैकी ४९,२२५ चौ.कि.मी.राखीव वनक्षेत्र, ८१९५ चौ.कि.मी.संरक्षित वनक्षेत्र व ४५१९ चौ.कि.मी.अवर्गीकृत वनक्षेत्र आहे. वनामुळे राज्यात मोठया प्रमाणावर मुख्य वनौपज तसेच गौण, वनौपज उपलब्ध होतात.

६१,९३९ चौ.कि.मी.राज्यातील एकूण वनक्षेत्रापैकी ५५४६२ चौ.कि.मी.वनक्षेत्र आदिवासी क्षेत्रात असून त्याची एकूण वनक्षेत्राशी टक्केवारी ८९.५४% आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रात वनक्षेत्राचे प्रमाण जास्त आहे. वनक्षेत्रातील मुख्य व गौण वनौपज गोळा करुन त्याच्या विक्रीमुळे होणाऱ्या उत्पन्नावर आदिवासींची उपजिविका भागविण्यासाठी गौण वनौपज हा एक महत्वाचा पूरक व्यवसाय आहे. जंगलात ३३ प्रकारचे गौणवनौपज सापडतात. यास योग्य किंमत मिळावी म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत एकाधिकार गौण वनौपज खरेदी योजना राबविण्यात येत आहे. विविध कार्यकारी आदिवासी सहकारी संस्थेमार्फतही आदिवासी सभासदांना या योजनेत मदत करण्यात येते.

आदिवासी बांधवांना सदर योजनेमुळे गौण वनौपजास, योग्य किंमत मिळून फायदा होतो का ? गौण वनौपज खरेदी विक्री व्यवहारात असलेल्या अडचणी यांचा अभ्यास करण्याकरिता या योजनेची मूल्यमापनासाठी निवड करण्यात आली आहे.

या मूल्यमापन अहवालाचे क्षेत्रीय काम श्री.एम.आर.गोसावी, संशोधन अधिकारी, श्री.एस.आर.तरकसबंध, संशोधन सहाय्यक व श्री.यू.एम.यादव, आरेखक यांनी केले असून. अहवाल संगणकीय टंकलेखनाचे (डी.टी.पी.) काम श्री.किरण कुर्डे, लघुटंकलेखक यांनी केले आहे. अहवालास अंतिम स्वरुप देण्याचे काम श्री.के.एस.चव्हाण, सांख्यिकी अधिकारी व श्री.पी.बी.कुदळे,संशोधन सहाय्यक यांनी श्री.एस.डी.बिराजदार, उपसंचालक (एक्षेविका) यांचे मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

ठिकाण- पुणे
दिनांक- 16.8.2006

**(वाय.पी.एस.तोमर)**
आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था.
महाराष्ट्र राज्य, पुणे १

# प्रकरण -१

# मूल्यमापनाचे उद्देश

आदिवासी लोकांनी गोळा केलेल्या वनौपजास बाजारपेठेत योग्य किंमत मिळत नाही. खाजगी व्यापाऱ्याकडून कमी किंमतीत वनौपज खरेदी करण्यात येते. त्याकरिता आदिवासींनी संकलित केलेल्या वनौपजास योग्य मोबदला देण्यासाठी, आदिवासी विकास महामंडळामार्फत एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत वनौपजाची शासनाकडून खरेदी करण्यात येते. याचा आदिवासी बांधवांना फायदा होतो का हे पाहण्यासाठी या योजनेची मूल्यमापनासाठी निवड करण्यात आली असून मूल्यमापनाचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

(१) गौण वनौपज गोळा करणे या कामावर जंगलतोडीमुळे होणारा परिणाम याचा अभ्यास करणे

(२) गौण वनौपजामुळे निर्माण होणाऱ्या रोजगार निर्मितीचा अभ्यास करणे

(३) गौण वनौपजाचा उपयोग करुन घेण्याच्या दृष्टीने वनौपजास देण्यात येणाऱ्या वाजवी किंमतीबाबतचा अभ्यास करणे.

(४) गौण वनौपजाच्या विविध उपयोगाबाबतचा अभ्यास करणे

(५) शासकीय व अशासकीय संघटनेमार्फत आदिवासींच्या विकासासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

* * *

# प्रकरण -२

## कार्यपध्दती

आदिवासी क्षेत्रातील वनांचे क्षेत्र राज्यातील एकूण वनक्षेत्राच्या ८९% आहे. वनक्षेत्रातील वनौपज गोळा करणे, विक्री करणे या प्रक्रियेत संबंधित असलेल्या यंत्रणा. आदिवासी विकास महामंडळातर्फे चालविण्यात येत असलेले गौण खनिज वनौपज एकाधिकारखरेदी प्राधिकरण आणि विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेले गौण खनिज वनौपज खरेदी केंद्र, यांच्याकडून अनुक्रमे प्रपत्र-१ व प्रपत्र-२ मध्ये माहिती संकलित केली आहे. तसेच गौण वनौपज गोळा करणाऱ्या कास्तकारांकडून प्रपत्र-३ मध्ये माहिती संकलित केली आहे.

**प्रपत्र-१ मध्ये कार्यान्वयीन यंत्रणेकडून खालील प्रकारची माहिती संकलित केली आहे.**

(१) खरेदी केंद्रावर वनौपज संकलित करण्याच्या पध्दती

गौण वनौपज खरेदी विक्री करण्याची पध्दत खालीलप्रमाणे दोन प्रकारची आहे.

(अ) अनुसूचित क्षेत्रातील (आदिवासी क्षेत्रातील) ३३ गौण वनौपज

(ब) अनुसूचित क्षेत्रातील (आदिवासी क्षेत्रातील) ३३ गौण वनौपजे सोडून इतर गौण वनौपजे तसेच अनुसूचित क्षेत्र सोडून इतर गौण वनौपजे तसेच अनुसूचित क्षेत्र सोडून इतर क्षेत्रातील गौण वनौपज

**(अ) अनुसूचित क्षेत्रातील (आदिवाी) क्षेत्रातील ३३ गौण वनौपजे**

केंद्र शासनाने पारित केलेला The Provision of the Panchayat extention to the scheduled Areas Act १९९६ ला अधीन राहून महाराष्ट्र राज्याने महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९९७ पारित केला आहे. या कायद्यानुसार अनुसूचित क्षेत्रातील शासकीय भूमीत असणाऱ्या ३३ प्रकारच्या गौण वनौपजावर ग्रामपंचायतीला मालकी हक्क देण्यात आला आहे.

सद्यस्थितीत ग्रामपंचायती या तांत्रिकदृष्टया सक्षम नसल्यामुळे अद्यापपर्यंत प्रत्यक्षात मालकी हक्काचे हस्तांतरण ग्रामपंचायतीना झालेले नाही. सदर ३३ गौण वनौपजांची खरेदी विक्री ही महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवीस विकस महामंडळ यांच्यातर्फे होत असते. यासाठी ग्राम विकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र.पंराज-१२०३/प्र.क्र.३६६/पीआर-२/(०६), दि.११.५.२००४ अन्वये महामंडळाला प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

**(ब). अनुसूचित क्षेत्रातील वर नमूद केलेली ३३ गौण वनौपज सोडून तसेच अनुसूचित क्षेत्र सोडून इतर क्षेत्रातील गौण वनौपजांचे निष्कासन**

*अनुसूचित क्षेत्रातील ३३ गौण वनौपज वगळून इतर गौण वनौपज तसेच गैर अनुसूचित क्षेत्रातील गौण वनौपजाची विक्री ही उघड लिलावाद्वारे उपवन संरक्षक यांच्या पातळीवर केली जाते. या गौण वनौपजांसाठी उपलब्धतेनुसार घटक तयार केलेले आहेत. या गौण वनौपजांचे घोषित असे उत्पादन नाही. या गौण वनौपजांची संकलनाची मजुरी संबंधित घटक खरेदीदार देतात. उघड लिलावामध्ये प्राप्त बोलीवर त्यानुसार त्यावेळेस उपलब्ध असणारे कर देय आहेत. गौण वनौपज संकलन व प्रक्रिया तसेच संकलन केलेले गौण वनौपजांची विक्री करणे या बाबी संबंधित घटक खरेदीदार करतात. यात शासनाच कुठल्याही प्रकारे सहभाग नसतो. लिलावामधील प्राप्त बोली हा शासनाचा महसूल आहे.*

*(२) संकलित केलेल्या गौण वनौपजावर करण्यात येणाऱ्या प्रक्रिया*

*(३) प्रचलित खरेदी पध्दतीमध्ये येणाऱ्या अडचणी*

*(४) गौण वनौपज संकलनात खरेदी करण्यात येणाऱ्या वनौपजाचे संकलन वाढविण्याच्या दृष्टीने माहिती.*

*(५) आदिवासींना योग्य किंमत मिळण्यासाठी करावे लागणारे उपाय.*

**प्रपत्र-२ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या केंद्राकडून संकलित करण्यात आलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.**

*(१) संस्थेतर्फे खरेदी करण्यात येत असलेली प्रमुख गौण वनौपजे*

*(२) संस्थेला गौण वनौपजाच्या खरेदीपोटी मिळणारे कमिशन*

*(३) वनौपज साठवणूकीबाबतच्या अडचणीची माहिती*

*(४) गौण वनौपज गोळा करण्याच्या अनुषंगाने देण्यात येत असलेल्या सुविधा*

*(५) कास्तकारांकडून आणि वन विभागाकडून खरेदी करण्यात येत असलेले वनौपज.*

**प्रपत्र-३ आदिवासी कास्तकारांकडून संकलित करण्यात आलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.**

*(१) कुटुंबांतील व्यक्तींची साक्षरता*

*(२) कुटंबांच्या जमिनधारणेबाबतची माहिती*

*(३) कास्तकाराकडील पशुधनाबाबतची माहिती*

(४) वनौपज गोळा करणे व विक्री करणे या अनुषंगाने वनौपज गोळा करणारे पुरुष व स्त्री यांना वनौपज गोळा करण्याचे काम कोणाकडून मिळते, किती दिवसांचे मिळते, या वनौपजाची विक्री कोणाकडे केली जाते. वनौपजास योग्य भाव मिळतो का याबाबतची माहिती

(५) वनौपज साठवणुकीबाबत असलेल्या अडचणी

(६) कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न

प्रपत्र १,२ व ३ मधील माहितीचे पृथ:करण प्रकरण क्र.४ मध्ये केलेले आहे.

मूल्यमापन अहवाल तयार करण्यासाठी लागणारी दुय्यम माहिती खालील कार्यालयाकडून संकलित करण्यात आली आहे.

**१) वनाबाबतची माहिती**

राज्यातील एकूण वनक्षेत्राची, वनाच्या वर्गीकरणानुसार असलेले वनक्षेत्र याची माहिती, मुख्य प्रधान वनसंरक्षक, नागपूर व वनसंरक्षक प्रादेशिक कार्यालय, यांचेकडून वनाबाबतची माहिती संकलित करण्यात आली आहे. (परिशिष्ट क्र.१ पहावे.)

**(२) गौण वनौपज उत्पन्न व मूल्यविषयक माहिती**

विभागीय वन अधिकारी, उप प्रादेशिक वन संरक्षक, सहाय्यक व्यवस्थापक, वन विकास प्रकल्प उपविभाग, विभागीय वन व्यवस्थापक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ, नागपूर या कार्यालयाकडून वनौपज उत्पन्न व मूल्यविषयक माहिती संकलित करण्यात आली आहे.

**(३) गौण वनौपज खरेदी व विक्रीची माहिती**

गौण वनौपज एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत खरेदी करण्यात आलेली गौण वनौपजे तसेच विक्री करण्यात आलेली वनौपजे, याबाबतची माहिती आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांचे कार्यालयाकडून संकलित करण्यात आलेली आहे.

वरील कार्यालयाकडून संकलित केलेल्या ३३ गौण वनौपजाच्या माहितीचा तपशील प्रकरण क्र.३ मध्ये देण्यात आलेला आहे.

* * *

# प्रकरण - ३

## गौण वनौपज एकाधिकार खरेदी योजना

आदिवासी शेतकरी व भूमीहिन मजूर यांची आर्थिक पिळवणूक नाहीशी करण्यासाठी १९७७-७८ मध्ये प्रथमत: आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ७ तालुक्यात गौण वनौपज एकाधिकार खरेदी योजना सुरु करण्यात आली. योजनेस मिळणारा प्रतिसाद व जनतेची मागणी लक्षात घेऊन आता या योजनेची व्याप्ती १५ जिल्हयातील ७२ तालुक्यात करण्यात आली आहे. गौण वनौजाची खरेदी व विक्री करण्यासाठी, व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ, मर्या.नाशिक यांची शासनाने मुख्य अभिकर्ता म्हणून नेमणूक केली आहे. आदिवासी विकास महामंडळाने उप अभिकर्ता, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थाच्या मार्फत ४५२ केंद्र,आणि महामंडळाची स्वत:ची १४२ केंद्रे अशी एकूण ५९४, केंद्रे स्थापित केली असून या केंद्रामार्फत एकाधिकार खरेदी योजनेअंतर्गत गौण वनौपजाची खरेदी करण्यात येते. याच केंद्रावर कृषी मालाची खरेदी केली जाते. १८ मे,१९९६ च्या शासन अधिसूचने अन्वये खरेदी केंद्रावर कोणत्या वनौपजाची खरेदी करावयाची याकरिता ३३ गौणवनौपजे निर्देशित केलेली आहेत. त्यांची यादी खालीलप्रमाणे-

(१) मोहाची फुले (२) मोहाची फळे (गळंबी) (३) गोंद (डिंक), (४) हिरडा (५) चारोळी (६) आवळा (सुका) (७) निर्मली/कावि (८) बेहडा (९) करंजबी (१०) बहावा (बी) (११) चिंच (बिगर बी) (१२) पांढरी मुसळी (१३) काळी मुसळी (१४) कुसुम लाख (१५) वन एरंडी (१६) टाकम/पावडा बी (१७) बावची -बी (१८) गुगुळ (१९) कुचलाकारा (२०) शिकेकाई (२१) रिटा (२२) बिबा (२३) गुंज बी (२४) काजू बी (२५) झाडू गवत (२६) वावडिंग (२७) बाफळी (२८) आंबा टोळी (२९) निंब (बी) (३०) चिंच बी (३१) पळस लाख (३२) सुके गवत (३३) सिताफळ

सदर गौणवनौपज कोणत्या भागात मिळते त्याचा उपयोग इ.बाबतची वनौपजनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

**(१) बेहडा** -या झाडाची उंची ३० ते ४० मीटर असून उष्ण हवामानाच्या पट्टयात गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, ठाणे, धुळे या जिल्हयात बेहडा वनौपजाचे उत्पन्न आढळते. बेहडा साधारणपणे फेब्रुवारी ते एप्रिल महिन्यात गोळा केला जातो. बेहडयाचे झाडापासून साल, फळे, पाने व डिंक प्राप्त होतो. याचा उपयोग उच्च रक्तदाब, ह्रदयविकार, अल्सर, पोटाचा विकार, आम्लपित्त इत्यादी औषधे तयार करण्यासाठी केला जातो. याचे चूर्ण करुन मधामध्ये मिसळून डोळयाच्या विकारावर वापरले जाते. चुर्ण व बियांच्या तेलाचा उपयोग केस गळणे थांबणे व काळे करणे यासाठी केला जातो. तेलाचा उपयोग खाद्य तेल म्हणून, साबण व सौंदर्य

तेल बनविण्यासाठी केला जातो. सालीचा व फळाचा उपयोग कातडे बनविण्यासाठी देखील केला जातो.

***(२) आवळा (सुका) :-*** आवळयाचे झाड मध्यम आकाराचे असून बहुतेक सर्व जिल्हयात आढळून येते. साधारणत: जानेवारी ते एप्रिल या कालावधीत आवळा गोळा केला जातो. पिकलेल्या आवळयामध्ये व्हिटॅमिनचे प्रमाण मोठया प्रमाणावर असते. आवळयाचा उपयोग क्षयरोग, खोकला, डोकेदुखी, अपचन, पोटाचे विकार यासाठी केला जातो. प्रिंटींगसाठी शाई तयार करण्याकरिता, केसाची वाढ होण्यासाठी, सौंदर्यप्रसाधने तयार करण्यासाठी केला जातो. आवळयाच्या झाडाच्या सालीचा उपयोग टॅनिन मटेरियल म्हणून केला जातो. याच्या बियांचा उपयोग अस्थमा, श्वसनासंबंधीचे विकार, डोळयाचे विकारावर, पोटदुखी यावर केला जातो.

***(३) बाहवा -बी :-*** बाहवा झाड १२ ते १५ फूट उंचीचे आणि तीन ते चार फूट रुंदीचे रंगीबेरंगी असते. हे झाड उष्ण प्रदेशात आढळते. दरवर्षी पाने गळून जातात. फेब्रुवारी व मार्च या कालावधीत बाहवा बी गोळा केले जाते. वाहबाच्या झाडाच्या शेंगा २५ ते ३० से.मी.लांबीच्या असतात. शेंगा वाळल्यानंतर त्यातील बी अलग करण्यात येते. या बी व पानापासून सोना मुरंबी नांवाचे सौम्य रेचक तयार केले जाते.

***(४) आंबा-टोळी :-*** आंबा टोळी झाड मध्यम आकाराचे असते. आंबा टोळी गोळा करण्याचा कालावधी एप्रिल ते ऑगस्ट हा असतो. आंब्याच्या कोया गोळा करुन सुकविल्या जातात. नंतर कोया फोडून आतील गर वेगळा करतात. सुकविलेल्या टोळीचे तुकडे करुन चूर्ण तयार केले जाते. त्यावर प्रक्रिया करुन मॅंगोबटर तयार केला जातो. त्याचा उपयोग सौंदर्य प्रसाधने, बेकरीचे पदार्थ तयार करण्यासाठी केला जातो. टोळीचे चूर्ण पचनशक्ती वाढविणा-या औषधांसाठी वापरतात. आंबा टोळीमध्ये नायट्रोजन, कॅल्शियम, फॉस्फरस यांचा समावेश असल्यामुळे पशुखाद्य तयार करण्यासाठी वापरतात.

***(५) करंज बी :-*** झाडाचा आकार मध्यम स्वरुपाचा असून गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा, ठाणे या जिल्हयात आढळून येते. गोळा करण्याचा कालावधी एप्रिल ते जून असा आहे. करंज झाडाच्या शेंगा तयार झाल्यानंतर त्यातून बिया वेगळया केल्या जातात. एका झाडापासून साधारणत: १० किलोपर्यंत बिया प्राप्त होतात. बियांपासून होणाऱ्या तेलांचा उपयोग उद्योगधंद्यात औषधे तयार करण्यासाठी केला जातो. यापासून सौंदर्यप्रसाधनाचे पदार्थ, वंगणयुक्त पदार्थ बनविले जातात. करंज बीची पेंड पशुखाद्य म्हणून वापरली जाते.

***(६) निर्मली/कावि :-*** उंच आकाराचे झाड असते. दरवर्षी पाने गळून जातात. याच्या बिया गोळा करण्याचा कालावधी नोव्हेंबर ते मार्च असा आहे. बियांचा उपयोग, गढूळ पाणी स्वच्छ करण्यासाठी, तसेच डायरिया, डायबेटीज, डोळयाचे विकार, यासारख्या रोगांवर औषधी तयार करण्यासाठी केला जातो.

***(७) वावडिंग :-*** वावडिंगचे झाड झुडपाच्या आकाराच्या वेलीसारखे पसरलेले असते. गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, अहमदनगर, या जिल्हयात वावडींगची झुडपे

आढळतात. बी व फळे नोव्हेंबर ते जानेवारी या कालावधीत गोळा करतात. फळांचा आकार गोलसर, रंग फिकट, लाल काळसर असतो. फळांचा उपयोग पोटातील जंत, त्वचा रोग, छातीचे विकार व हाडताप यासारख्या रोगांकरिता तयार होणाऱ्या औषधांमध्ये केला जातो. सुकलेल्या फळांचा उपयोग, आयुर्वेदिक औषधे बनविण्यासाठी केला जातो.

**(८) वन एरंडी :-** तीन ते चार मी.उंचीचे छोटे झाड असून वनएरंडी साधारणत: नोव्हेंबर ते मार्च महिन्यात गोळा करतात. वन एरंडीच्या बियाच्या तेलाचा उपयोग, सौंदर्य प्रसाधने साहित्य तयार करण्यासाठी, केशसंवर्धनासाठी, उष्णतेच्या विकारावरील उपचारासाठी, पक्षघात, पाठदुखी इत्यादी रोगावरील औषध तयार करण्यासाठी केला जातो. एरंडीच्या बीयांचा भुसा प्लॅस्टिक उद्योगात कच्चा माल म्हणून वापरतात. एरंडीचे तेल रेचक म्हणून वापरले जाते.

**(९) कुसुम लाख :-** हे झाड मध्यम आकाराचे असून झाडावर लाख नांवाचा लेसीफर जातीचा कीडा नेहमी आढळतो, त्याच्यातून द्रव स्वरुपात स्त्रावयुक्त पदार्थ वाहत असतो. या झाडापासून लाख, साधारणत: माहे फेब्रुवारी ते जून या कालावधीत गोळा केली जाते. झाडाची पाने लाख किडयाचे आवडते खाद्य असते. किडयाच्या शरीरातून वाहणाऱ्या द्रवरुप स्त्रावाचे झाडावर ब्रुडींग होते. ते झाडावरुन काढून त्याचे काळजीपूर्वक साठवणूक करतात. लाखेचा उपयोग वॉर्निश, पॉलिश, सिलींग, काडतूस फॅक्टरी, वीजेची उपकरणे बनविण्यासाठी तसेच प्लॅस्टीक उद्योगात कच्चा माल म्हणून वापर केला जातो. पाणबुडी उद्योग, जहाज उद्योग इ.मध्ये देखील याचा वापर होतो.

**(१०) चिंच व चिंचबी :-** गोळा करण्याचा कालावधी साधारणत: जानेवारी ते एप्रिल हा आहे. यापासून चटणी, सॉस, मुरंबा, लोणचे व बेकरीचे पदार्थ तयार करतात. तसेच सायट्रीक आम्ल, लॅक्टीक आम्ल, पेंटीन, अल्कहोल इ.रसायने तयार करण्यासाठी वापर केला जातो. चिंच बीचा उपयोग स्टार्च फॅक्टरीसाठी कच्चामाल म्हणून गोळा केला जातो. चिंचबीची पावडर करुन खाण्यासाठी, खाद्य उत्पादने, ड्रिंक बेकरीचे पदार्थ यासाठी केला जातो. यात जिलेटीन नांवाचा गुणधर्म असल्याने रबर व कापड तयार करण्यासाठी तसेच इतर उपयोगासाठी त्याचा वापर केला जातो.

**(११) पांढरी मुसळी :-** पांढरी मुसळी, गडचिरोली, चंद्रपूर, ठाणे, भंडारा, यवतमाळ जिल्हयात तुरळक ठिकाणी आढळते. पांढरी मुसळी, कंदमुळी असून गोळा करण्याचा कालावधी सप्टेंबर ते डिसेंबर असा आहे. या कंदमुळीचा शरीरासाठी एक प्रकारचे टॉनिक असते. त्याचा उपयोग स्त्रियांचे प्रसुतीवरील रोगांचे निवारण करयासाठी, शरीरातील अशक्तपणा दूर करण्यासाठी तसेच स्नायुंचे विकार व मेंदू ज्वर यासारख्या रोगावर औषधे तयार करण्यासाठी केला जातो.

**(१२) बिब्बा :-** हे मोठया आकाराचे झाड असून उष्ण प्रदेशात आढळते. बिब्बा गोळा करण्याचा कालावधी फेब्रुवारी ते एप्रिल असा आहे. बिब्याचे फळ सुकल्यानंतर काळया रंगाचे दिसते. त्याची चव तुरट असते. बिब्बा हा ज्वालाग्राही असल्याने सुकल्यानंतर काळजीपूर्वक

डब्यात साठवतात. त्याचा उपयोग रंग तयार करणे, चामडे मिळविणे, किटकनाशक तयार करणे यासाठी केला जातो. बिब्बा तेलाचा उपयोग कारखान्यामध्ये ऑईल/ग्रिस/वंगण म्हणून देखील होतो.

**(१३) बाफळी** - हे छोटया आकाराचे झुडुप असून साधारणपणे एक ते दीड मीटर उंचीचे असते. बाफळीचे फळ माहे ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत गोळा केले जाते. बाफळीचे फळ लिंबू सारख्या वासाचे असते. फळे गोळा करुन सुकवतात व बारदानात भरुन ठेवतात. बाफळीचे फळ औषध म्हणून तसेच मसाला म्हणून वापरतात. फळाचा अर्क काढून काढा करतात व जठर किंवा पोटाचे विकार तसेच आतडयांच्या रोगांवर वापरतात. बाफळीच्या फळापासून मिळणाऱ्या तेलाचा उपयोग टॉनिकमध्ये केला जातो.

**(१४) कडूनिंब बी-** निंब बी राज्यात मे ते जुलै या कालावधीत गोळा केले जातो. निंबोळया गोळा करुन त्याची साल व गर काढून बी वेगळे करतात. नंतर सुकवून बारदानात किंवा कागदी पिशव्यात भरुन ठेवतात. निंब बी पासून तेल काढून मलेरिया, कुष्ठरोग, देवी, त्वचा रोग इ.वर त्याचा उपयोग होतो. पशुरोगशास्त्रात देखील याचा उपयोग होतो. बी पासून तेल काढल्यानंतर उरलेला भुसा/पेंड यांचा किटकनाशक औषधे व पशुखाद्य म्हणून वापर केला जातो. निंब बी चा उपयोग मधुमेह, स्त्रियांचे प्रसुतीचे रोग, डोळयांचे विकार इ.रोगांवरील औषधे तयार करण्यासाठी करतात.

**(१५) गुंज बी-** गुंज छोटया झुडपाच्या स्वरुपात आढळते. गुंज बी माहे नोव्हेंबर ते फेब्रुवारी या काळात गोळा केले जाते. गुंज बी लहान वाटाण्याच्या आकाराचे लाल रंगाचे असते. गोळा केलेले बी बारदानात साठवून ठेवतात. गुंज बी मध्ये ॲग्रेन नांवाचे रासायनिक द्रव्य असते व ते अतिशय विषारी असते. गुंजच्या पानाचा व मुळीचा उपयोग सर्दी, पडसे, खोकला इ.आजारावरील औषधे तयार करण्यासाठी केला जातो.

**(१६) कुचला कारा** - याचे झाड मोठया आकाराचे असून उष्ण प्रदेशात आढळून येते. या झाडाची फळे व बी साधारणत: नोव्हेंबर ते मार्च या काळात गोळा करतात. बी थाळीच्या आकाराचे किंव गोल नाण्यासारखे दिसते. फळ गोल आकाराचे व साधारणपणे २ ते ४ से.मी.रुंदीचे असते. बी राखाडी किंवा हिरवट करडया रंगाचे असते. त्याची चव अत्यंत कडवट असते. कुचलाकारा हे अतिशय विषारी असते. ते गोळा करुन सुकविल्यानंतर बारदानात साठवून ठेवतात. त्याचा उपयोग उंदीर मारण्यासाठी केला जातो. तसेच श्वासोच्छवास नियमित करण्यासाठी व शरीराला बसणारे आचके थांबविण्यासाठी बनविणाऱ्या औषधात त्याचा वापर केला जातो.

**(१७) रिठा** - रिठाचे झाड छोटया आकाराचे असून अतिशय उष्ण भागात आढळते. रिठाचे बी व फळे साधारणत: माहे मार्च ते मे या कालावधीत गोळा केली जातात. पिकलेल्या रिठा झाडावरुन किंवा जमिनीवर पडल्यावर गोळा करतात. तसेच सूर्यप्रकाशात सुकवितात. रिठा साठविण्यासाठी बारदानाचा उपयोग करतात. रिठामध्ये सॅलॉजिन नांवाचे रासायनिक द्रव्य

असत. रिठाचा उपयोग रेशमी, सिल्क लोकरीचे तसेच तत्सम कपडे धुण्यासाठी मोठया प्रमाणावर केला जातो. तसेच केस धुण्यासाठी मोठया प्रमाणावर केला जातो. दंत रोगावरील औषधीमध्ये याचा वापर करतात. तसेच याची पावडर दागिने साफ करण्यासाठी केला जातो.

***(१८) पळस लाख*** - *याचे झाड वक्राकार व मध्यम आकाराचे असत. हे झाड ज्वालाग्राही असून त्यावर लाख नांवाच्या किडयांचे नेहमी वास्तव्य असते. या किडयाच्या शरीरातून द्रव स्वरुपाचा स्त्रावयुक्त पदार्थ वाहत असतो. या स्त्रावाचे झाडावर ब्रुडींग होते. हे झाड गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ व भंडारा इ. जिल्हयात हे झाड आढळून येते. पळसाच्या झाडापासून लाख साधारणत: जून जुलै महिन्यात गोळा करण्यात येते. लाखेचा उपयोग वार्निश, पॉलीश, सिलींग, काडतूस, वीजेची उपकरणे इ.मध्ये केला जातो. प्लॅस्टीक उद्योगात कच्चामाल म्हणून देखील लाख वापरतात. पाणबुडी व जहाज उद्योगात देखील याला चांगली मागणी आहे.*

***(१९) टाकळा /पावडा बी***- *टाकळा /पावडा हे वनस्पती युक्त झुडुप, दरवर्षी उगवणारे रानगवत असून गडचिरोली, यवतमाळ, चंद्रपूर, भंडारा ठाणे इ.जिल्हयात आढळते. टाकळा/पावडाच्या शेंगातील बी साधारणत: ऑगस्ट ते ऑक्टोबर या कालावधीत गोळा केले जाते. टाकला/पावडाच्या शेंगा ६ ते ९ इंच लांबीच्या असतात. त्यात चपटया आकाराच्या बिया असतात. या बियांचा उपयोग कॉफीला पर्याय म्हणून वापरतात. सुकलेल्या शेंगा गोळा करुन बी काढले जाते. गोळा केलेले बी बारदानात भरुन ठेवतात. झाडाची पाने, बी व मुळीचा उपयोग उष्णता निवारण, डोळयाचे विकार, लिव्हर टॉनिक, खोकला, हृदयरोग इ.विकारावर औषधे तयार करण्यासाठी करतात. टाकळयाची पाने, एरंडी तेलात भिजवून फोडावर व जखमेवर लेप देण्यासाठी वापरतात. पाने व बियांचा उपयोग त्वचा रोग, कुष्ठरोग, अपचन, खोकला, रक्तदाब, ताप. इ.रोगांवर औषधे तयार करण्यासाठी करतात.*

***(२०) काजू बी***- *काजूचे झाड हिरव्या रंगाचे पसरणारे, खरखरीत साल असलेले असते. काजू बी एप्रिल ते जून महिन्यात गोळा करतात. काजूचे फळे लाल रंगाचे व किडनीच्या आकाराचे असते. सुकलेले फळ गोळा केल्यानंतर ते भाजल्यानंतर काजू कवच फोडण्यात येऊन आतून बी काढण्यात येते. काजू बी पौष्टीक व शक्तीवर्धक असते. याचा टॉनिकमध्ये वापर होतो. काजू कच्चे किंवा तळून, भाजून देखील खाद्य म्हणून वापरतात.*

***(२१) गुग्गुल :-*** *याचे झाड छोटया आकाराचे व झुडुपासारखे दिसते. गुग्गुल साधारणत: जानेवारी ते एप्रिल महिन्यात गोळा करतात. झाडावर कोयत्याचे घाव घालून त्यातून डिंकासारखा चिकट पदार्थ गोळा केला जातो. त्याला राप्त किंवा कश धुन म्हणतात. त्याचा रंग हिंगुळासारखा लालसर व तांबडा असतो. गुग्गुलाचा उपयोग सुगंधी धूप तयार करण्यासाठी व इतर सुवासिक साहित्य तयार करण्यासाठी करतात. गुग्गुलापासून जख्मेवरील मलम तयार करतात. पोटातील विकारावर यापासून प्रभावी औषधे तयार करतात.*

***(२२) झाडू गवत :-*** *हे गवत गडचिरोली, यवतमाळ, चंद्रपूर, ठाणे इ.जिल्हयात आढळते. गोळा करण्याचा कालावधी जानेवारी ते जून असा आहे. लांबसडक गवत कापून सूर्यप्रकाशात वाळत*

टाकण्यात येते. सदर गवत वाळल्यानंतर त्याचे गड्डे बांधतात. त्याचा उपयोग झाडू तयार करण्यासाठी करतात.

***(२३) मोहा फुले व मोहा बीज :-*** मोहा फुलाचे झाड मध्यम आकाराचे असते. ठाणे, नाशिक, धुळे, जळगांव, चंद्रपूर, गडचिरोली इ.जिल्हयात ही झाडे येतात. मोहा फुले गोळा करण्याचा कालावधी मे ते जुलै असून मोहा बीज मार्च ते जुलै महिन्यात गोळा करतात. मोहा फुलाच्या झाडावरुन किंवा खाली पडलेली मोहा फुले गोळा केली जातात व ती सूर्यप्रकाशात सुकविली जातात. त्याची चव गोड असते. मोहा फुले बारदानात भरुन ठेवतात. मोहा फुलांचा उपयोग औषधे तयार करण्यासठी केला जातो. तसेच या फुलांपासून दारु देखील तयार करतात. पशुखाद्य तयार करण्यासाठीही या फुलांचा उपयोग होतो. टॉनिक, शक्तीवर्धक औषधे तसेच पोटाचे विकारासंबंधी औषधात त्याचा वापर केला जातो. मोहा बीज किंवा बी पासून तेल काढून त्याचा उपयोग कोको बट तयार करण्यासाठी केला जातो. तसेच तेल खाण्यासाठी देखील वापरले जाते. बेकरीचे पदार्थ, सौंदर्य प्रसाधने साहित्य तयार करण्यासाठी हयाचा उपयोग केला जातो. तेल काढल्यानंतर उरलेली पेंड/भुस्सा मच्छिपालन व्यवसायात फिश पॉईझन म्हणून देखील उपयोगात आणतात.

***(२४) बावची बी :-*** बावची झाडाची पाने मोठी व दीर्घ वर्तुळाकार असतात. बावची बी महाराष्ट्रात माहे डिसेंबर ते एप्रिल या कालावधीत गोळा करतात. बावचीच्या शेपटयाला लहान आकाराच्या शेंगा असतात. त्या शेंगा तोडून सुकविलया जातात. त्यातून बी वेगळे काढतात. बी गंधरहित असते व त्याची चव कडू असते. बी वाळवून त्याची साठवणूक केली जाते. बावची बीचा उपयोग आयुर्वेदिक औषधे तयार करण्यासाठी केला जातो. बावची बी हे सौम्य रेचक असते. तसेच त्याचा उपयोग कुष्ठरोगावर व रक्त शुध्दीकरणासाठी तयार होणाऱ्या औषधांमध्ये केला जातो. त्वचा रोग, उष्णता निवारण यासंबंधी रोगावर मलम तयार करण्यासाठी देखील त्याचा वापर करतात.

***(२५) हिरडा*** - हिरडयाचे झाड आकाराने मध्यम स्वरुपाचे असून पुणे, नगर, धुळे, नंदूरबार, गडचिरोली तसेच राज्यातील डोंगराळ भागात हिरडयाची झाडे मोठया प्रमाणावर येतात. हिरडा गोळा करण्याचा हंगाम माहे नोव्हेंबर ते जानेवारी तसेच मे ते जुलै असतो. हिरडयामध्ये दोन प्रकार आहेत. पैकी बाळहिरडा हा आकाराने लहान असून त्याचे फळ गडद तपकिरी रंगाचे असते. बाळ हिरडयापासून आयुर्वेदिक औषधे तयार करतात. त्यामुळे बाळ हिरडयाला फार मोठी मागणी असते व त्याला भावही चांगला मिळतो. दुसऱ्या प्रकारच्या हिरडयाचे फळ मोठया आकाराचे असते. वाळल्यानंतर फिकट पिवळया रंगाचे असते. या हिरडयामध्ये हिरडा सबरस नं.१, हिरडा सबरस नं.२ व हिरडा कळी अशा तीन प्रती उपलब्ध आहेत. यामध्ये हिरडा कळीस जास्त भाव मिळतो. हा हिरडा रंगाच्या कारखान्यात तसेच चामडी वस्तु तयार करण्याच्या उद्योगात वापरण्यात येतो. पुणे जिल्हयातील आदिवासी भागात हिरडा गोळा करण्याचे काम आदिवासी मोठया प्रमाणात करतात. तसेच गोळा केलेला हिरडा पोत्यात भरुन आदिवासी महामंडळाच्या खरेदी केंद्रावर आणून विकतात.

गौण वनौपज गोळा करण्याच्या कामात एका व्यक्तीला साधारणपणे ७० ते ९० रु. मिळतात. आदिवासी कास्तकारांना वर्षभरामध्ये साधारणत: चार ते पाच महिने काम मिळते. एकाधिकार खरेदी केंद्रावर खरेदी केलेला हिरडा तालुक्याच्या ठिकाणी पाठविण्यात येतो. आदिवासी महामंडळ वर्तमानपत्रात जाहिराती देऊन लिलावाच्या तारखा जाहीर करतात. सदर तारखांना खुल्या लिलाव प्रक्रियेमध्ये जास्त बोली लावणाऱ्या व्यापाऱ्यांना हिरडयाची विक्री करण्यात येते.

गोळा करण्यात आलेल्या सर्व माहितीचे पृथ:करण करण्यात आले असून त्यामध्ये आढळलेल्या बाबी तसेच क्षेत्रीय पाहणीत आढळलेल्या गोष्टी यावर सविस्तर चर्चा पुढील प्रकरण क्र.४ मध्ये केली आहे.

एकाधिकार गौण वनौपज खरेदी योजनेंतर्गत आदिवासी विकास महामंडळामार्फत वर्षनिहाय वनौपजनिहाय केलेली खरेदी आणि विक्री याची माहिती तक्ता क्र.३.१ ते क्र.३.६ मध्ये देण्यात आली आहे.

सन १९९७-९८ ते २००२-०३ या कालावधीत आदिवासी विकास महामंडळामार्फत करण्यात आलेल्या गौण वनौपजाची खरेदी व विक्री याची माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

**गौण वनौपजांची खरेदी व विक्री विषयक माहिती दर्शविणारा तक्ता**

**तक्ता क्र.३.१**

**वजन क्विंटलमध्ये**
**किंमत रुपये**

| अ.क्र. | वर्ष | खरेदी | | विक्री | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण खरेदी (क्विंटल) | एकूण मूल्य (रुपये)लाखांत | एकूण विक्री (क्विंटल) | एकूण मूल्य (रुपये) लाखांत |
| १. | १९९७-९८ | ८९६३६ | ३२४.६१ | ५६६९२ | १६१.६३ |
| २. | १९९८-९९ | ५७९०१ | ३७२.४९ | ४२५२३ | ३२६.०३ |
| ३. | १९९९-२००० | ६५८२० | ४५७.४६ | २३३०३ | २२२.४० |
| ४. | २०००-०१ | ५९८१९ | २४७.०६ | ६७५० | ३०.९७ |
| ५. | २००१-०२ | २६६६४ | १२०.५० | ११६७४ | ९७.६८ |
| ६. | २००२-०३ | ३१४१० | १४३.०१ | १५६१६ | ८४.८३ |
| **एकूण** | | **३३१३५०** | **१६६५.१२** | **१५३५५८** | **९२३.५४** |

आधार :- आदिवासी विकास महामंडळ, नाशिक

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसते की, सन १९९७-९८ मध्ये ८९,६३६ क्विंटल गौण वनौपज खरेदी करण्यात आले तर सन २००१-०२ मध्ये २६६६४ क्विंटल गौण वनौपज खरेदी करण्यात आली आहे. म्हणजे गौण वनौपज खरेदीचे प्रमाण कमी होत आहे. विक्रीची तुलना करता सन १९९७-९८ मध्ये ५६,६९२ क्विंटल गौण वनौपजांची विक्री झाली. तर सन २००२-०३ मध्ये १५,६१६ क्विंटल गौण वनौपजाची विक्री झाली आहे. म्हणजे विक्रीचे प्रमाणही कमी होत आहे. खरेदी व विक्री कमी झाल्याचे दिसते. म्हणजे गौण वनौपजाच्या उत्पन्नातही घट होत असल्याचे दिसून येते. सन २००२-०३ मध्ये महामंडळाने गौण वनौपजनिहाय केलेली खरेदी व विक्री बाबतची माहिती पुढीज तक्त्यात दिलेली केलेली आहे.

एकाधिकार गौण वनौपज खरेदी योजनेखाली आदिवासी विकास महामंडळामार्फत करण्यात आलेल्या गौण वनौपजांची खरेदी विक्री विषयक माहिती दर्शविणारा तक्ता

वर्ष-२००२-०३ (वजन- क्विंटल, किंमत रुपये)

**तक्ता क्र. ३.२**

| अ. क्र. | गौण वनौपजाचे नांव | खरेदी | | | विक्री | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरासरी किंमत प्रति क्विंटल रु. | एकुण खरेदी क्विंटल | एकूण मूल्य रुपये | सरासरी किंमत प्रति क्विंटल रु. | एकुण विक्री क्विंटल | एकूण मूल्य रुपये |
| १. | हिरडा | ४८३ | १७७९२ | ८५८५६२९ | १६४ | ५४८२ | ११९२२३७७ |
| २. | डिंक | ३२८३ | ३०० | ९८४८२० | ४६०१ | २१६ | १०९४६५९ |
| ३. | पळसलाख | १४२५ | ०.६० | ८५५ | २००० | १ | ११०० |
| ४. | टोळंबी | ५४७ | २ | १०९४ | ६५२ | २ | १३०५ |
| ५. | मोहाफुले | ५१६ | ७७४० | ३९९७३६२ | ७४० | ५७५२ | ४५३९६६३ |
| ६. | चारोळी | १३२५४ | ०.५२ | ६८९२ | १४४०० | १ | ७२०० |
| ७. | बिब्बा | १०० | ०.०१ | १ | - | - | - |
| ८. | बेहडा | - | - | - | ११५ | - | - |
| ९. | आवळा | ११४५ | २ | २२८९ | ११०७ | ३ | ३३२२ |
| १०. | चिंच | ७८० | ३ | २३४० | - | - | - |
| ११. | शिकेकाई | २३६० | ४७ | ११०९२० | - | - | - |
| १२. | गवत | १०९ | ५५०६ | ५९९९३५ | २१९ | ४१५९ | ९१२८५० |
| १३. | रिठा | ४९८ | १७ | ८४७४ | - | - | - |
| | **एकूण** | | **३१४१०.१३** | **१४३००६११** | - | **१५६१६** | **८४८२४७६** |

आधार :- आदिवासी विकास महामंडळ, नाशिक

## तक्ता क्र. ३.३

**महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयामार्फत खरेदी करण्यात आलेल्या गौण वनौपज मालाची प्रादेशिक कार्यालयनिहाय खरेदी व विक्री दर्शविणारा तक्ता**

(वजन- क्विंटल, किंमत रुपये)

| अ. क्र. | प्रादेशिक कार्यालय | | वर्ष २०००-०१ | | वर्ष २००१-०२ | | वर्ष २००२-०३ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वजन | किंमत | वजन | किंमत | वजन | किंमत |
| १. | जव्हार | खरेदी | ७७६५ | ८७८१४४ | ९१ | १३९४०१ | ५५४४ | ६४२५४३ |
| | | विक्री | ५८४९ | १३४५२१३ | - | - | ४१६८ | ९३१५०४ |
| २. | नाशिक | खरेदी | - | - | - | - | - | - |
| | | विक्री | - | - | - | - | - | - |
| ३. | नंदूरबार | खरेदी | ७ | १५५०२ | १८२ | १३४०६८ | २६५ | ११३६४३ |
| | | विक्री | ६ | ११०८० | ११७ | १०४२७२ | २५ | १०४४८० |
| ४. | जुन्नर | खरेदी | ४६३८६ | २०९३०१६६ | १७३९६ | ७६४९०२७ | १६७१६ | ८५४४५९७ |
| | | विक्री | १२१ | ३१८२८१ | ४७०८ | ५५७६०२० | ५४८३ | ११२२३७७ |
| ५. | धारणी | खरेदी | १४१ | ५४५७३ | १३ | ६५०० | ११ | ६२७७ |
| | | विक्री | - | - | - | - | १० | ७८८३ |
| ६. | यवतमाळ | खरेदी | ४ | १०७६३ | १३२ | ३५३८३ | १० | ६३८२ |
| | | विक्री | - | - | - | - | - | - |
| ७. | भंडारा | खरेदी | २२८० | ८३६५७७ | १०८३ | ५१४१४८ | ९७८ | ४८९२८८ |
| | | विक्री | ३० | १३६६२ | १०५३ | ५६७१५३ | ९२९ | ६४८१३१ |
| ८. | चंद्रपूर | खरेदी | - | - | १३९७ | ६३६५०९ | ३४०९ | १८२७९११ |
| | | विक्री | - | - | ११७८ | ६५०८२८ | २९३९ | २३५७२६० |
| ९. | अहेरी | खरेदी | २६३३ | १५२९२६३ | ४४३ | ३८८६२२ | ५०३ | ८३१६१२ |
| | | विक्री | ६५८ | ११०३३१७ | २९० | ४३३२९२ | १७३ | ९१५८७४ |
| १० | गडचिरोली | खरेदी | ६०३ | ४५०५९७ | ५९२५ | २५४६२९१ | ३९७४ | १८३८३५९ |
| | | विक्री | ८६ | २९७६७१ | ४३२६ | २४३६५५७ | १८९० | १५९४९६७ |
| **एकूण** | | **खरेदी** | **५९८१९** | **२४७०५५८५** | **२६६६२** | **१२०४९९४९** | **३१४१०** | **१४३००६१२** |
| | | **विक्री** | **६७५०** | **३०९७२२४** | **११६७२** | **९७६८१२२** | **१५६१७** | **८४८२४७६** |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, नाशिक व यवतमाळ प्रादेशिक कार्यालयाची विक्री निरंक असून गडचिरोली व जुन्नर, चंद्रपूर, अहेरी, भंडारा प्रादेशिक कार्यालयामार्फत मोठया प्रमाणात गौण वनौपजांची खरेदी व विक्री झालेली आहे.

आधार - आदिवासी विकास महामंडळ, नाशिक

प्रादेशिक कार्यालयनिहाय, वर्षनिहाय (१९९७-९८ ते २००२-२००३) गौण वनौपजांची खरेदी व विक्री याची माहिती परिशिष्ट-३ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ३.४**

**गौण वनौपज एकाधिकार खरेदी योजनेअंतर्गत प्रादेशिक कार्यालयनिहाय, वर्षनिहाय, योजनेचा लाभ घेतलेल्या आदिवासी लाभार्थ्यांची संख्या**

| अ. क्र. | प्रादेशिक कार्यालय | वर्षनिहाय आदिवासी लाभार्थी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ |
| १. | जव्हार | २२६७३ | ७२८ | १४८ | ८८६ | ५२ | १२७० |
| २. | नाशिक | ३२१ | ८९ | - | - | - | - |
| ३. | नंदुरबार | ३२६४ | ५७६३ | २३५८ | ३७ | ४८२ | २२४ |
| ४. | जुन्नर | ३४७७४ | ३४९९७ | ३४३६४ | ४१५३६ | ३०७१७ | ३३४७२ |
| ५. | धारणी | १७८९ | ३१२ | ४०६ | ३० | ५ | २५ |
| ६. | यवतमाळ | ४२४९ | १५२ | २५० | २१ | २१ | २१ |
| ७. | भंडारा | ९९०४ | २७५६० | १४७२ | १७७८ | १०१६ | ४५९ |
| ८. | चंद्रपूर | ५४२० | २१०६२ | ९५१ | ० | ७४९ | ३५०८ |
| ९. | अहेरी | - | - | २११६ | ९३७ | ४८९ | ७१५ |
| १० | गडचिरोली | १२७९३ | १८१३० | ५२०३ | १०४७ | १४०६ | ४०९१ |
| | **एकूण** | **९५१८७** | **१०८७९३** | **४७२६८** | **४६२७२** | **३४९३७** | **४३७८५** |

आधार - आदिवासी विकास महामंडळ, नाशिक

सन १९९७-९८ व १९९८-९९ मध्ये आदिवासी लाभार्थ्यांची संख्या अनुक्रम ९५,१८७ व १,०८,७९३ इतकी होती. त्यामध्ये नंतरच्या वर्षामध्ये मोठया प्रमाणावर घट झालेली आहे. सन २००१-०२ मध्ये सर्वात कमी म्हणजे फक्त ३४,९३७ आदिवासी लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे.

## तक्ता क्र. ३.५

### महाराष्ट्र राज्यातील आदिवासी जिल्हयाची जिल्हानिहाय गौण वनोपजाचे उत्पादन व विक्री मूल्य

उत्पादन क्विंटलमध्ये- विक्री मूल्य रुपये हजारात - वर्ष-२००२-०३

| अ.क्र. | जिल्हा | उत्पादन | विक्री मूल्य |
|---|---|---|---|
| १. | ठाणे | १२,८९६ | ७९७ |
| २. | रायगड | १,०१९ | ३३० |
| ३. | नाशिक | १९,३५६ | ५१० |
| ४. | धुळे | ३,८०४ | १,९१५ |
| ५. | नंदूरबार | १०,८७९ | ३,५८३ |
| ६. | जळगांव | ३८,६६७ | ५,२४२ |
| ७. | अहमदनगर | २,१४८ | ६६ |
| ८. | पुणे | १,१९० | ५१८ |
| ९. | हिंगोली | ९,०२६ | ४,०६९ |
| १०. | नांदेड | १८,१६० | ८६,४९० |
| ११. | बुलढाणा | ८,३१३ | २,४९९ |
| १२. | अकोला | १६,०४८ | ४,८६० |
| १३. | अमरावती | १५,९३४ | १३,४७३ |
| १४. | यवतमाळ | ६४,१२९ | २७,४७६ |
| १५. | वर्धा | ११,२६७ | ८,१०५ |
| १६. | नागपूर | ६४,६१० | ५१,१३६ |
| १७. | भंडारा | ४३,५६९ | २५,५७६ |
| १८. | गोंदिया | ८७,९३३ | ३१,३४४ |
| १९. | चंद्रपूर | ८२,८३८ | १,२६,६६९ |
| २०. | गडचिरोली | ३,२०,०१२ | ९,३८,८७३ |
| | **एकूण आदिवासी उपयोजना क्षेत्र** | **८,३१,७९८** | **१३,३३,५४२** |

## तक्ता क्र. ३.६

**महाराष्ट्र राज्यातील बिगर आदिवासी जिल्हयाची जिल्हानिहाय गौण वनौजपाचे उत्पादन व विक्रीमूल्य**

**उत्पादन क्विंटलमध्ये- विक्री मूल्य रुपये हजारात - वर्ष-२००२-२००३**

| अ.क्र. | जिल्हा | उत्पादन | विक्री मूल्य |
|---|---|---|---|
| १. | रत्नागिरी | २८६ | २६२ |
| २. | सिंधुदुर्ग | २९८ | १४५ |
| ३. | सातारा | २,३६९ | ३६९ |
| ४. | सांगली | ५५६ | ३६ |
| ५. | सोलापूर | ७० | ५ |
| ६. | कोल्हापूर | १,१०५ | २२३ |
| ७. | औरंगाबाद | ७,३५८ | १,३९७ |
| ८. | जालना | १,२१६ | ४८० |
| ९. | परभणी | ४,६४३ | १,९२८ |
| १०. | बीड | ३,४०७ | २,५४० |
| ११ | लातूर | १,१०० | २११ |
| | **एकूण बिगर आदिवासी उपयोजना** | **२२,४०८** | **७,५९६** |
| | **एकूण आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्र** | **८,५४,२०६** | **१३,४१,१३८** |

वरील ३.५ व ३.६ दोन्ही तक्त्यावरुन असे दिसून येते की,आदिवासी जिल्हयामध्ये गौण वनौपजाचे उत्पादन ८,३१,७९८ क्विंटल आहे. तर बिगर आदिवासी जिल्हयातील उत्पादन फक्त २२,४०८ क्विंटल आहे. तर विक्रीचे मूल्य आदिवासी जिल्हयामध्ये १३,३३,५४२ हजार रुपये आहे. तर बिगर आदिवासी जिल्हयामध्ये ७,५९६ हजार रुपये आहे. म्हणजे आदिवासी जिल्हयाच्या उत्पन्नाच्या, बिगर आदिवासी जिल्हयाचे उत्पादन, फक्त २.६९% तर विक्री मूल्य ०.५७% आहे.

* * *

# प्रकरण -४
# क्षेत्रीय पाहणी व यंत्रणेकडून गोळा केलेल्या माहितीचे पृथ:करण

*सर्वेक्षणात यंत्रणेकडून संकलित करण्यात आलेल्या माहितीचे पृथ:करण खालीलप्रमाणे आहे.*

**वनक्षेत्र :-**

*महाराष्ट्र राज्यात ६१,९३९ चौ.कि.मी.वनक्षेत्र आहे. यापैकी आदिवासी उपयोजना क्षेत्र असलेल्या जिल्हयात ५५,३६३ चौ.कि.मी.वनक्षेत्र आहे. थोडक्यात आदिवासी उपयोजना क्षेत्र असणाऱ्या जिल्हयातील वनक्षेत्र राज्यातील एकूण वनक्षेत्राच्या ८९.३८% इतके आहे. थोडक्यात आदिवासींची अर्थव्यवस्था जरी कृषीप्रधान असली तरी पूरक व्यवसायासाठी आदिवासींना वनातील गौण वनौपजावर अवलंबून रहावे लागते. जिल्हानिहाय वनक्षेत्र खालील तक्त्यामध्ये दिलेला आहे.*

**तक्ता क्र.४.१**

**महाराष्ट्र राज्यातील आदिवासी जिल्हानिहाय वनक्षेत्र**

**वर्ष-२००२-०३ (अस्थायी)** **(वनक्षेत्र चौ.कि.मी.)**

| अ.क्र. | जिल्हा | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | ठाणे | २,८७९ | ९५९ | ४ | ३,८४२ |
| २. | रायगड | १,४११ | १७२ | १६४ | १,७४७ |
| ३. | नाशिक | ३,१७४ | २४४ | १२ | ३,४३० |
| ४. | धुळे | २,०४७ | ४ | ० | २,०५१ |
| ५. | नंदूरबार | २,१८२ | ४७ | १६३ | २,३९२ |
| ६. | जळगांव | १,९७२ | १९ | ० | १,९९१ |
| ७. | अहमदनगर | १,९२४ | १४ | ५६ | १,९९४ |
| ८. | पुणे | १,८१९ | ० | २६१ | २,०८० |
| ९. | नांदेड | १,०६० | ३ | २१८ | १,२८१ |
| १०. | हिंगोली | २५२ | ० | २३ | २७५ |
| ११. | बुलढाणा | १,०६५ | १०० | ० | १,१६५ |

| अ.क्र. | जिल्हा | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १२. | अकोला | ४५२ | १५ | १ | ४६८ |
| १३. | अमरावती | ३,४९२ | १० | ० | ३,५०२ |
| १४. | यवतमाळ | २,७८२ | १७४ | ० | २,९५६ |
| १५. | वर्धा | ५९९ | ३३८ | ११० | १,०४७ |
| १६. | नागपूर | १,४१९ | ८२९ | ५१७ | २,७६५ |
| १७. | भंडारा | ८८२ | ३१६ | ३१९ | १,५१७ |
| १८. | गोंदिया | १,३९७ | ७८३ | ६५३ | २,८३३ |
| १९. | चंद्रपूर | ४,०४० | ८३० | १३४ | ५,००४ |
| २०. | गडचिरोली | ९,८९६ | २,८२९ | २९८ | १३,०२३ |
| | **एकूण आ.उ.क्षेत्र** | **४४,६६४** | **७,६८६** | **३,०१३** | **५५,३६३** |

**तक्ता क्र.४.२**

**महाराष्ट्र राज्यातील बिगर आदिवासी जिल्हानिहाय वनक्षेत्र**

**वर्ष-२००२-०३ (अस्थायी)** **(वनक्षेत्र चौ.कि.मी.)**

| अ.क्र. | जिल्हा | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुंबई शहर | - | - | - | - |
| २. | मुंबई उपनगर | १३ | - | ३१ | ४४ |
| ३. | रत्नागिरी | १३ | - | ५१ | ६४ |
| ४. | सिंधुदुर्ग | १६५ | - | ३९२ | ५५७ |
| ५. | सातारा | १,३८७ | ४८ | १०७ | १,५४२ |
| ६. | सांगली | ४७४ | २ | ३४ | ५१० |
| ७. | सोलापूर | ३४४ | - | १४ | ३५८ |
| ८. | कोल्हापूर | ६३३ | ४१७ | ६९२ | १,७४२ |
| ९. | औरंगाबाद | ८१९ | २२ | ५९ | ९०० |
| १०. | जालना | ७९ | २ | १८ | ९९ |
| ११. | परभणी | ८२ | - | १७ | ९९ |

| अ.क्र. | जिल्हा | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १२. | बीड | १९९ | १७ | २४ | २४० |
| १३. | उस्मानाबाद | ३१ | - | ३० | ६१ |
| १४. | लातूर | ३ | - | ३७ | ४० |
| १५. | वाशिम | ३१९ | १ | - | ३२० |
| **एकूण** | **बिगर आ.उ.क्षेत्र** | **४,५६१** | **५०९** | **१,५०६** | **६,५७६** |
| | **एकूण** | **४९,२२५** | **८,११५** | **४,५११** | **६१,९३९** |
| **एकूण** | **आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्र** | **९३,८८९** | **१५,८८१** | **७,५३२** | **१,१७,३०२** |

**वनोपजाचे उत्पन्न :-**

वन विभागाच्या आकडेवारीवरुन असे दिसून येते. की सन २००२-०३ मध्ये राज्यात गौण वनौपजाचे एकूण उत्पादन ८५४२०६ क्विंटल झाले असून त्याचे एकूण मूल्य १३४.११ कोटी रुपये इतके आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील उत्पन्न ८३१७९८ क्विंटल असून त्याचे विक्री मूल्य १३३.३५ कोटी रुपये आहे. म्हणजे एकूण गौण वनौपज उत्पन्नापैकी ९९% उत्पादन आदिवासी उपयोजना क्षेत्र असणाऱ्या जिल्हयात झाले आहे.

**वनौपजाची खरेदी :-**

आदिवासी विकास महामंडळाने सन २००२-०३ या वर्षात एकूण ३१४१०.१३ क्विंटल गौण वनौपजाची खरेदी केली. सदर खरेदीपोटी आदिवासी कास्तकारांना रु.१४३.०१ लाख अदा करण्यात आले. सदर खरेदीमध्ये एकूण १२ गौण वनौपजाचा समावेश होता. खरेदी रकान्यात आलेल्या गौण वनौपजामध्ये हिरडा, डिंक, शिकेकाई, गवत, रिठा इ.चा समावेश असून खरेदीमध्ये हिरडा, डिंक, मोहाफुले, शिकेकाई, गवत या पाच गौण वनौपजांचा एकूण खरेदीमध्ये फार मोठा वाटा आहे. सदर गौण वनौपजांच्या खरेदीपोटी आदिवासी कास्तकारांना १४२.७९ लाख रुपये अदा करण्यात आले. उर्वरित ७ गौण वनौपजाचे प्रमाण अत्यंत कमी असून सदर गौण वनौपजामध्ये पळस लाख, टोळंबी, चारोळी,बिब्बा, आवळा, चिंच, रिठा इ.चा समावेश आहे.

**वनौपजाची विक्री**

सन २००२-०३ मध्ये आदिवासी विकास महामंडळाने हिरडा, डिंक, पळसलाख, टोळंबी, मोहा फुले, चारोळी, बेहडा, आवळा, गवत ३१,४१० क्विंटल या गौण वनौपजाची विक्री केली असून त्यामुळे महामंडळाला १२९.०४ लाख रु.प्राप्त झाले आहेत. विक्री केलेल्या गौण वनौपजामध्ये हिरडा, डिंक, मोहाची फुले, गवत या चार गौणवनौपजाचे प्रमाण जास्त

असून त्यांचे विक्री पोटी महामंडळाला १२८.९० लाख रु.प्राप्त झाले आहेत. थोडक्यात विक्रीमध्ये उर्वरित पळसलाख, टोळंबी, चारोळी, बेहडा, आवळा या पाच गौण वनौपजाचे प्रमाण अत्यल्प असून त्याचे विक्रीपोटी महामंडळाला फक्त १३,८४८ रु.प्राप्त झाले आहेत.

**क्षेत्रीय पाहणीमध्ये आढळलेल्या बाबी**

**(१) कामाचा कालावधी :-**

गौण वनौपज गोळा करणाऱ्या कास्तकारांना या पूरक व्यवसायामध्ये वर्षामध्ये साधारणपणे ४ ते ५ महिने काम मिळते. याबाबतची माहिती खालील तक्त्यामध्ये देण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.४.३

कुटुंबांतील गौण वनौपजा गोळा करणाऱ्या व्यक्ती व त्यांना मिळणारा रोजगार महिन्यामध्ये

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कुटुंब संख्या | माल गोळा करणारे | | | कालावधी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्री | एकूण | २ महिने | अडीच महिने | ३ महिने | साडे तीन महिने | ४ महिने | साडेचार महिने | ५ महिने |
| १. | ठाणे | डहाणू | ३० | १९ | ३० | ४९ | ७ | ९ | १२ | २ | ० | ० | ० |
| २. | पुणे | खेड | २० | १८ | २३ | ४१ | ४ | १ | ४ | ३ | ४ | ४ | ० |
| ३. | गडचिरोली | धानोरा | २७ | ४२ | ३३ | ७५ | ० | २ | १ | २ | १५ | ० | ७ |
| | | भामरागड | ७ | १३ | १२ | २५ | ० | ० | ० | ० | ३ | ० | ४ |
| ४. | अमरावती | धारणी | १८ | २१ | २७ | ४८ | ० | ० | ० | ४ | ३ | ८ | ३ |
| | | एकूण | १०२ | ११३ | १२५ | २३८ | ११ | १२ | १७ | ११ | २५ | १२ | १४ |

गौण वनौपज गोळा करणाऱ्या व्यक्तींचा जिल्हावार विचार केला असता, सर्वात जास्त व्यक्ती गडचिरोली जिल्हयामध्ये १०० इतक्या असून, ठाणे जिल्हयामध्ये ४९, अमरावती जिल्हयामध्ये ४८ तर सर्वात कमी गौण वनौपज गोळा करणाऱ्या व्यक्ती पुणे जिल्हयामध्ये असून त्यांची एकूण संख्या ४१ इतकी आहे.

**(२) दारिद्रय रेषेखालील प्रमाण :-**

गौण वनौपज गोळा करणाऱ्या कास्तकारांमध्ये दारिद्रय रेषेखाली व कास्तकारांचे प्रमाण जास्त असून या पूरक व्यवसायामुळे त्यांना फक्त हंगामात रु.४००० ते २२००० रु.पर्यंत उत्पन्न मिळते. कुटुंबांतील सदस्यांपैकी महिला कास्तकारांचे प्रमाण या व्यवसायात जास्त असून पुरुष कास्तकार शेतमजूरी, मोलमजुरी इ.मध्ये जास्त प्रमाणात गुंतलेले आढळले. सविस्तर माहिती खालील तक्त्यामध्ये दिलेली आहे.

### तक्ता क्र.४.४
### दारिद्र्य रेषेखालील कुटुंब संख्या

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कुटुंब संख्या | दारिद्र्य रेषोखाली कुटुंब आहे काय | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | होय | नाही |
| १. | ठाणे | डहाणू | ३० | २५ | ५ |
| २. | पुणे | खेड | २० | १४ | ६ |
| ३. | गडचिरोली | धानोरा | २७ | २७ | ० |
| | | भामरागड | ७ | ७ | ० |
| ४. | अमरावती | धारणी | १८ | १८ | ० |
| | | **एकूण** | **१०२** | **९१** | **११** |
| | | **शेकडा प्रमाण** | **१००%** | **८९%** | **११%** |

एकूण १०२ लाभार्थींपैकी ९१ (८९%) लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील आहेत. तर ११ (११%) लाभार्थी दारिद्र्य रेषेच्या वरील आहेत. गडचिरोली जिल्हयातील ३४ पैकी ३४ व अमरावती जिल्हयातील १८ पैकी १८ लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील असल्याचे आढळून आले आहे.

**(३) वनौपज गोळा करणाऱ्या कास्तकारांचे प्रमाण :-**

गौण वनौपज गोळा करणाऱ्या आदिवासी कास्तकारांचे प्रमाण घटत चाललेले दिसत असून मुलाखत घेतलेल्या एकूण आदिवासी कुटुंबापैकी फक्त २५ ते ३० टक्के कुटुंबे या पूरक व्यवसायात आढळली. याबाबत सखोल चौकशी केली असता खालील कारणे सांगण्यात आली.

**(अ) गौण वनौपज उपलब्धतेचे प्रमाण कमी**

जंगलामध्ये सापडणाऱ्या गौण वनौपजांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत असल्याने संकलन कामासाठी फार वणवण भटकावे लागते. तसेच जंगलामध्ये लांबवर ८ ते १० कि.मी.पर्यंत जावे लागते. त्यामुळे सध्या हा व्यवसाय फार फायदेशीर ठरत नाही.

**(ब) इतर कामावर मिळणारी जादा मजुरी :-**

मोलमजुरी, वीटभट्टी मजुरी, चिकूवाडी मजुरीवर गेल्यास मिळणा-या मजुरीची रक्कम चांगली मिळते. त्यामुळे या व्यवसायातील आदिवासी कास्तकारांचे प्रमाण घटत चालले आहे.

**(क) खाजगी जमिनीत वनौपज देणाऱ्या झाडांची लागवड करण्याचे प्रमाण कमी :-**

गौण वनौपज गोळा करणाऱ्या आदिवासी कास्तकारांकडे शेतजमिन जरी असली तरी बहुसंख्य शेतजमिनी जिरायती असून त्या जमिनीत आदिवासी कास्तकार मुख्यत्वे भात पिकवितात. स्वत:च्या शेतजमिनीवर गौण वनौपज देणाऱ्या झाडांची लागवड करणाऱ्या कास्तकारांचे प्रमाण अत्यल्प आढळले. याबाबत चौकशी केली असता लागवड परवडत नाही किंवा झाडे लावण्याची आवश्यकता वाटत नाही, असे सांगण्यात आले. मात्र गडचिरोली येथे मोहाची झाडे कास्तकारांनी लावलेली आढळली. अधिक माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.४.५

लाभधारकाच्या स्वत:च्या जमिनीवरील गौणवनौपजाच्या झाडांबाबतचा तक्ता

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कुटुंब संख्या | जमिनीचे क्षेत्र | | स्वत:चे जमिनीत असलेली झाडे | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | हे. | आर. | मोहा | हिरडा | चिच | कलमी बीट | साग | बांबू | आवळा | आंबे | पेरु | जांभुळ | एकूण | शेकडा प्रमाण |
| १. | ठाणे | डहाणू | ३० | ७ | २० | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ | ० |
| २. | पुणे | खेड | २० | १७ | २४ | ० | १३४२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १३४२ | ८३ |
| ३. | गडचिरोली | धानोरा | २७ | ३९ | ०० | १०२ | ०० | ३ | १ | २२ | २ | ३ | २३ | ० | ० | १५६ | १० |
| | | भामरागड | ७ | १२ | ७० | १८ | ०० | १ | ० | ० | ० | ० | ४ | ० | ० | २३ | २ |
| ४. | अमरावती | धारणी | १८ | २१ | ७० | ६३ | ०० | ० | १ | ० | ० | ० | ९ | ४ | ७ | ८४ | ५ |
| | | **एकूण** | **१०२** | **९८** | **८४** | **१८८** | **१३४२** | **४** | **२** | **२२** | **२** | **३** | **३६** | **४** | **७** | **१६१०** | **१००** |
| | **शेकडा** | **प्रमाण** | | | | **१२** | **८४** | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **२** | **०** | **१** | **१००** | **-** |

सर्वेक्षण करण्यात आलेल्या १०२ लाभधारकांच्या जमिनीमध्ये १६१० गौण वनौपजाची झाडे असल्याचे आढळून आले असून त्यामध्ये सर्वात जास्त १३४२ हिरडयाची, १८८ मोहाची, ३६ आंब्याची व २२ सागाची झाडे असल्याचे आढळून आले आहे. इतर प्रकारच्या झाडांची संख्या नगण्य असल्याचे दिसून येते.

जिल्हावार गौण वनौपजाच्या झाडांचा विचार केला असता पुणे जिल्हयामध्ये १३४२, गडचिरोली जिल्हयामध्ये १७९ अमरावती जिल्हयामध्ये ८४ तर सर्वात कमी ५ झाडे ठाणे जिल्हयामध्ये असल्याचे निदर्शनास आले आहे.

**(ड) महामंडळ व आदिवासी सहकारी संस्थांकडून करण्यात येणारी खरेदी:-**

आदिवासी विकास महामंडळ तसेच आदिवासी सहकारी संस्था यांचेमार्फत होणारी खरेदी काही अपवाद वगळता आदिवासींना पसंत असल्याने खाजगी व्यापाऱ्यांना गौण वनौपज विकत नाहीत, असे बहुसंख्य आदिवासींनी सांगितले.

**(इ) गौण वनौपजाच्या खरेदी किंमतीत वाढ व्हावी:-**

महामंडळामार्फत होणाऱ्या खरेदीबाबत आदिवासी समाधानी असून मालाचे योग्य भाव/वजन तसेच योग्य वजन चिठ्ठी त्यांना मिळत असून त्याबाबत काहीही तक्रार नाही. मात्र गडचिरोली येथील कास्तकारांनी त्यांना मिळणारी किंमत कमी असून त्यात वाढ व्हावी, असे स्पष्टपणे नमूद केले आहे.

**(ई) वनौपजास मिळणाऱ्या मोबदल्याचा कालावधी :-**

महामंडळ गोदामात शिल्लक असलेल्या साठयांवर नजरगहाण कर्जे घेऊन आदिवासी कास्तकारांना गौण वनौपज किंमत रोखीने अदा करीत असल्याने आदिवासी कास्तकारांना रक्कम मिळण्यासाठी वाटप पहावी लागत नाही. अपवादात्मक स्थितीमये दोन ते तीन दिवस विलंब होतो.

**(फ) वनौपज साठवणूक :-**

गौण वनौपज गोळा करणारे आदिवासी कास्तकार पोत्यामध्ये गौण वनौपज संकलित करीत असून पोते खरेदी केंद्रावर नेऊन विकतात. फारसा माल साठवून ठेवत नाहीत. त्यामुळे माल साठवणुकीबाबत समस्या नसल्याचे बहुसंख्य कास्तकारांनी सर्वेक्षणाच्या वेळी सांगितले.

**(ग) गौण वनौपज उत्पन्न वाढ :-**

गौण वनौपज व्यवसायात मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ करता येणे शक्य आहे काय या बाबींबाबत कास्तकारांकडे चौकशी केली असता, महामंडळाने जर वस्तुचे भाव वाढवून दिले तर उत्पन्न वाढू शकेल, असे बहुसंख्य कास्तकारांनी सांगितले.

***वरील बाबीच्या अनुषंगाने महामंडळातील अधिकाऱ्यांशी विचारविनिमय केला असता खालील गोष्टी आढळून आल्या.***

*आदिवासी कास्तकारांकडून खरेदी केलेली गौण वनौपजे, प्रादेशिक व्यवस्थापक कार्यालयामार्फत विकली जातात. त्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन खुल्या लिलाव पध्दतीने विक्री प्रक्रिया राबविली जाते. मागील दोन वर्षाच्या हिरडयाच्या लिलावाबाबत असा अनुभव आला आहे की, मोठया हिरडयाबाबत व्यापाऱ्यांकडून लिलावामध्ये किंमती वाढवून येत नाहीत. त्यामुळे हिरडयाचा साठा मोठया प्रमाणावर शिल्लक आहे. अशा परिस्थितीत महामंडळाला नुकसान सोसावे लागते. त्यामुळे सद्यस्थितीत खरेदी किंमतीत वाढ करता येत नाही.*

***वनौपजांची किंमत देण्याचा कालावधी :-***

*गौण वनौपजे गोळा करणाऱ्या आदिवासी कास्तकार कुटुंबांना वनौपजांची किंमत वनौपज खरेदीच्या वेळी देण्यात येते. तसेच प्राप्त होणारी रक्कम उदरनिर्वाहासाठी वापरण्यात येत असल्याचे बहुसंख्य आदिवासी कास्तकारांनी मुलाखतीच्या वेळी सांगितले. त्यामुळे सदर उत्पन्नातून कास्तकारांकडे शिल्लक पडत नाही किंवा बचत खात्यात भरण्यात येत नसल्याचे आढळून आले.*

***वनौपज खरेदीच्या वेळी करावयाची प्रतवारी :-***

*आदिवासी महामंडळाच्या खरेदी केंद्रावर शेती उत्पादने, तसेच गौण वनौपज एकत्रितरित्या खरेदी करण्यात येतात. खरेदी केंद्रावर गौण वनौपज खरेदीसाठी वेगळी व्यवस्था किंवा प्रतवारी करण्यासाठी वेगळे कर्मचारी आढळले नाहीत.*

***वनौपज झाडे लावण्याकडे असलेली प्रवृत्ती :-***

*गडचिरोली तसेच अमरावती जिल्हयातील बहुसंख्य कास्तकारांची जमिन वनखात्याची असून ते लोक वर्षानुवर्षे कसत आहेत. गडचिरोली तसेच अमरावती जिल्हयांमध्ये बहुसंख्य कास्तकारांनी मोहाची झाडे लावली असून इतर गौणवनौपज झाडे लावण्याकडे त्यांचा कल दिसत नाही.*

***वनौपज झाडे लावण्याकडे असलेली प्रवृत्ती :-***

*गडचिरोली तसेच अमरावती जिल्हयातील बहुसंख्य कास्ताकरांच्या जमिनी वनखात्याची असून, ते लोक वर्षानुवर्षे ती जमीन कसत आहेत. गडचिरोली तसेच अमरावती जिल्हयातील बहुसंख्य कास्तकारांनी मोहाची झाडे लावली असून इतर गौण वनौपज झाडे लावण्याकडे त्यांचा कल दिसत नाही.*

*नमुना तत्वावर केलेल्या क्षेत्रीय पाहणीच्या आधारे काही महत्वाच्या तक्त्यात माहिती संकलित केली असून त्यामध्ये व्यवसायाचे वर्गीकरण दारिद्रय रेषेखालील कुटुंबे, कुटुंबांची जमीन धारणा, कुटुंबांकडे असणारे पशुधन, गौण वनौपज संकलनाच्या कामामुळे मिळणारे उत्पन्न इ.बाबींची माहिती पुढील तक्ता क्र.४.१ ते ४.५ मध्ये संकलित केलेली आहे.*

क्षेत्रीय पाहणीमध्ये आदिवासी कुटुंबांकडून त्यांचा प्रमुख व्यवसाय तसेच दुय्यम व्यवसाय या संबंधी माहिती गोळा केली असून त्याचे व्यवसाय, शेती, शेतमजुरी, मोलमजुरी, चिक्कुवाडीत मजुरी, गौण वनौपज संकलित करुन विकणे इ.व्यवसाय आढळले आहेत. मुख्य व्यवसाय, दुय्यम व्यवसाय यांची जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.४.६**

**मुख्य व दुय्यम व्यवसायानुसार माहिती**

| अ. क्र. | व्यवसायाचे स्वरुप | | कुटुंबांची संख्या | | | | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ठाणे | पुणे | गडचिरोली | अमरावती | | |
| १. | मुख्य व्यवसाय | | | | | | | |
| | १) | शेती | ६ | २० | ३१ | १८ | ७५ | ७४ |
| | २) | शेतमजुरी | १७ | - | १ | - | १८ | १७ |
| | ३) | मोलमजुरी | ७ | - | १ | - | ८ | ८ |
| | ४) | गौण वनौपज | - | - | १ | - | १ | १ |
| | **एकूण** | | **३०** | **२०** | **३४** | **१८** | **१०२** | **१००** |
| २. | दुय्यम व्यवसाय | | | | | | | |
| | १) | शेती | - | - | - | - | - | |
| | २) | गौण वनौपज | ३० | २० | ३३ | १६ | ९९ | ९७ |
| | ३) | शेतमजुरी करणे | - | - | १ | २ | ३ | ३ |
| | **एकूण** | | **३०** | **२०** | **३४** | **१८** | **१०२** | **१००** |

सर्वेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांकडून दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची माहिती संकलित केली असून एकूण कुटुंबांमध्ये दारिद्र्य रेषेखालील असलेल्या कुटुंबांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

वरील तक्त्यातील माहितीवरुन असे दिसून येते की, एकूण १०२ कुटुंबापैकी मुख्य व्यवसाय, शेती असणारे ७५ कुटुंब (७४%) असून शेतमजुरी करणारे १८ कुटुंबे (१७%) असून मोलमजुरी करणारे ८ कुटुंबे (८%) आहेत आणि गौण वनौपज मुख्य व्यवसाय करणारे एकच कुटुंब आहे. यावरुन असे निदर्शनास येते की, गौणवनौपज हा आदिवासी कुटुंबांचा दुय्यम व्यवसाय आहे.

दुय्यम व्यवसाय करणारे एकूण कुटुंबे ही १०२ आहेत. यामध्ये ९९ कुटुंबे (९९%) गौण व्यवसाय करतात आणि शेतमजुरी करणारे फक्त ३ कुटुंब (३%) आहेत. यावरुन स्पष्ट होते

की, आदिवासी कुटुंबांचे, गौण खनिज गोळा करणे हा दुय्यम व्यवसाय आहे आणि जवळपास सर्वच कुटुंबे हा व्यवसाय करतात.

गौण वनौपज संकलित करणाऱ्या आदिवासी कुटुंबांना या कामापासून वार्षिक किती उत्पन्न मिळते. याबाबत माहिती संकलित केली असून उत्पन्नाच्या वर्गीकरणप्रमाणे जिल्हानिहाय कुटुंबांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.४.७**

**उत्पन्नाबाबतची माहिती**

| **अ.क्र.** | **गौण वनौपज संकलनापासून उत्पन्न** | **कुटुंबांची संख्या** | | | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **ठाणे** | **पुणे** | **गडचिरोली** | **अमरावती** | |
| १. | रु. ० ते २००० | ८ | - | १ | - | ९ |
| २. | रु.२००१ ते ४००० | २२ | - | १ | - | २३ |
| ३. | रु.४००१ ते ६००० | - | - | १४ | ३ | १७ |
| ४. | रु.६००१ ते ८००० | -. | ७ | १३ | १३ | ३३ |
| ५. | रु.८००१ ते १०००० | - | १२ | ४ | २ | १८ |
| ६. | रु.१०००१पेक्षा जास्त | १ | - | ९ | १ | ११ |
| | **एकूण** | **३०** | **२०** | **३४** | **१८** | **१०२** |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, कास्तकारांना या व्यवसायापासून सर्वसाधारणपणे रु.६००१ ते १०,००० पेक्षा जास्त उत्पन्न मिळते. स्वतःच्या जमिनीवर गौण वनौपजाच्या झाडांची लागवड केल्यास हे उत्पन्न रु.२२,००० पर्यंत वाढू शकेल. गौण वनौपज संकलनाचा कालावधी वर्षामध्ये साधारणपणे ३ ते ५ महिने असल्याने आदिवासी कास्तकारांनी हा व्यवसाय पूरक म्हणून स्विकारल्याचे आढळले. तसेच या कामात कुटुंबांतील एक किंवा दोन व्यक्ती या व्यवसायात सहभागी असल्याचे दिसले.

गडचिरोली जिल्हयातील सर्वेक्षणात, आदिवासी कास्तकारांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, मोहाच्या फुलांचा त्यांना मिळणारा भाव कमी असून त्यात वाढ होणे अत्यंत आवश्यक आहे. याप्रमाणेच पुणे जिल्हयात हिरडयाच्या किंमतीबाबत काही कास्तकारांनी हिरडयाची किंमत कमी मिळत असल्याचे नमूद केले आहे.

गौण वनौपज यांचे उत्पादन जंगलातील झाडापासून होत असते. जंगलतोडीमुळे झाडे विरळ होऊ लागली. आदिवासी कास्तकारांना गौण वनौपज संकलित करण्यासाठी जंगलात वणवण व दूर भटकावे लागते. पायी जाण्या-येण्यात जास्त वेळ खर्च झाल्याने गौण वनौपज संकलन कमी होऊ लागले. त्यामुळे दरवर्षी होणारे गौण वनौपजाचे संकलन कमी होत असल्याचे

*मागील सात वर्षाच्या आकडेवारीवरुन दिसते. आदिवासी विकास महामंडळ यांचे मार्फत राज्यात खरेदी करण्यात आलेल्या गौण वनौपजाची माहिती खालील तक्त्यात संकलित केली आहे.*

**तक्ता क्र.४.८**

| अ.क्र. | वर्ष | राज्यातील एकूण गौण वनौपज खरेदी (क्विंटल) |
|---|---|---|
| १. | १९९६-९७ | १,१३,१२२ |
| २. | १९९७-९८ | ८९,६३६ |
| ३. | १९९८-९९ | ५७,९०१ |
| ४. | १९९९-२००० | ६५,८२० |
| ५. | २०००-०१ | ५९,८१९ |
| ६. | २००१-०२ | २६,६६४ |
| ७. | २००२-०३ | ३१,४१० |
| | **एकूण** | **४,४४,३७२** |

*उपरोक्त आकडेवारीवरुन लक्षात येते की, सन १९९६-९७ मध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सर्व जिल्हयात एकुण १.१३ लाख क्विंटल गौण वनौपज खरेदी करण्यात आले. ही आकडेवारी घटत जाऊन सन २००२-०३ मध्ये ३१ हजार क्विंटलपर्यंत खाली आली आहे.*

*आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जास्त वनक्षेत्र असणाऱ्या सात महत्वाच्या जिल्हयातील गौणवनौपज उत्पादनाबाबतची मागील पाच वर्षाची माहिती वन विभागातील कार्यालयाकडून संकलित केली आहे. त्यावरुन देखील असे आढळते की, मागील पाच वर्षात महत्वाच्या गौण वनौपज वस्तुंचे उत्पादन घटत चालले आहे.*

**तक्ता क्र.४.९**

**आदिवासी उपयोजना क्षेत्रातील महत्वाच्या ७ जिल्हयातील वर्ष १९९८-९९ ते २००२-०३ या कालावधीत गौण वनौपज उत्पादनाचा तपशील दर्शविणारा तक्ता**

**उत्पादन क्विंटलमध्ये**

| अ. क्र. | जिल्हा | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | नांदेड | २७३३९ | २५०२९ | २०३२० | १८९१९ | ९५ |
| २. | गडचिरोली | ११८६९ | १८५५८ | १६२६३ | १३८९३ | ४५२० |
| ३. | ठाणे | ११९११ | १८४६ | ४२२४ | ५०६० | ११२५६ |
| ४. | पुणे | ४९०० | ११०६० | १६१८० | १२१४९ | ११९० |
| ५. | भंडारा | २१८१४ | १०४६७ | १६४८४ | १३४५७ | ३३५०० |

| अ. क्र. | जिल्हा | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ |
|---|---|---|---|---|---|---|
| ६. | चंद्रपूर | ५४८ | १६३९ | २२३९ | १२७ | ३८९ |
| ७. | नंदूरबार | २५६१ | ९६८ | २ | ४ | ३७ |
| | **एकूण** | **९६,९४२** | **७७,५६७** | **७५,७१२** | **६३,६०९** | **५०,९०७** |

**टीप-** उपरोक्त उत्पादनात मोहाफुले, हिरडा, डिंक, गवत, लाख, सिताफळ, बावडिंग, बेहडा, शिकेकाई, चिंचफळे, चारोळी इ.गौण वनौपजांचा समावेश आहे.

**आधार :-** १) उपवन संरक्षक - संबंधित जिल्हे
२) वनमहामंडळ - संबंधित जिल्हे
३) वन संरक्षक - संबधित जिल्हे

उपरोक्त जिल्हे आदिवासी उपयोजना क्षेत्रातील असून त्यामध्ये मोठया प्रमाणात वनक्षेत्र आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अनुसूचीतील महत्वाच्या गौण वनौपजांची मागील पाच वर्षातील वरील उत्पादन विषयक आकडेवारीवरुन असे दिसून येते की, दिवसेंदिवस गौण वनौपजाचे उत्पादन कमी होत आहे. सन १९९८-९९ मध्ये ९६,९४२ क्विंटल उत्पादन होते ते दरवर्षी थोडे थोडे घटत जाऊन सन २००२-०३ मध्ये ५०,९०७ क्विंटल इतके झाले आहे.

आदिवासी विकास महामंडळ, आदिवासी शेतकरी, कारागिर, भूमीहिन मजुर यांची खाजगी व्यापाऱ्यांकडून आर्थिक पिळवणूक होऊ नये, याकरिता प्रभावी माध्यम म्हणून आदिवासी विकास महामंडळा अंतर्गत एकाधिकार खरेदी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत दरवर्षी आदिवासी कास्तकारांकडील कृषी तसेच गौण वनौपज मालाची हमी भावाने खरेदी केली जाते. आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत हमी दराने भरड धान्ये व मालाची खरेदी केली जाते. सन २००२-०३मधील कृषी व गौण वनौपज मालाच्या खरेदीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

### तक्ता क्र.४.१०
### कृषी व गौण वनोपज मालाच्या खरेदी माहितीबाबतचा तक्ता

| अ.क्र. | योजनेचे नांव | वजन (क्विंटल) | किंमत (रु.कोटीत) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | भरड धान्ये व भात खरेदी योजना | ४२०५२२ | २२.७३ | ५१% |
| २. | एकाधिकार कृषी उत्पन्न योजना | २५६८८९ | २०.३२ | ४६% |
| ३. | एकाधिकार गौण वनौपज | ३१४१० | १.४३ | ३% |
| | **एकूण** | **७०८८२१** | **४४.४९८** | **१००%** |

उपरोक्त आकडेवारीवरुन लक्षात येते की, एकाधिकार खरेदी योजनेत गौण वनौपज खरेदी योजनेचा वाटा अत्यंत कमी असून खरेदी किंमतीत ३ टक्के रक्कम गौण वनौपज खरेदी करता खर्च झाली आहे. महामंडळाकडे वरील तिन्ही योजनांची खरेदी एकाच केंद्रावर होत

असते. गौण वनौपज खरेदीकरिता वेगळे कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले नाहीत. वाहतूक तसेच विपणन व्यवस्थेत देखील तिन्ही योजनांचे काम एकत्रित करण्यात येते.

एकाधिकार खरेदी योजना, हमी भाव व सामान्य योजना या योजनेअंतर्गत कास्तकाराकडून माल खरेदी करण्यातयेऊन नंतर त्याची विक्री करण्यात येते.

या अनुषंगाने याची मागील पाच वर्षाची आर्थिक उलाढाल, प्रशासकीय खर्चाचे उलाढालीशी असलेले शेकडा प्रमाण, योजना राबविणाचा प्रशासकीय खर्च, त्यासाठी नफा/तोटा, निव्वळ नफा/निव्वळ तोटा याची स्थिती पुढील तक्त्यात दिलेली आहे.

**तक्ता क्र.४.११**

**(वर्ष २००२-०३),**

रु.लाखांत

| अ.क्र. | योजना | आर्थिक उलाढाल | व्यापारी नफा/तोटा | निव्वळ नफा/तोटा |
|---|---|---|---|---|
| १. | एकाधिकार धान्य व गौण वनौपज खरेदी योजना | ३७०३.४२ | (-) ६२.३९ | (-) ४८८.३९ |
| २. | हमी भाव योजना | ५४५०.२५ | (-) ००.८६ | (-) ००.८६ |
| ३. | सामान्य योजना | १३३७.२९ | (+) १३५.५५ | (+) २१५.६९ |
| | **एकूण** | **१०४९०.९६** | (+) ७२.३० | (-) २७३.५६ |

उपरोक्त योजना क्र.१ व २ मध्ये मंडळाला तोटा झालेला असून सामान्य योजना क्र.३ मधील उलाढालीत मंडळ नफयात आहे.

**तक्ता क्र.४.१२**

मागील पाच वर्षाची आर्थिक उलाढाल, प्रशासकीय खर्चाचे उलाढालीशी असलेले शेकडा प्रमाण, योजना राबविणाचा प्रशासकीय खर्च, त्यासाठी नफा/तोटा, निव्वळ नफा/निव्वळ तोटा याबाबतचा तक्ता

| **हंगाम** | **वार्षिक उलाढाल** (रुपये लक्ष) | **प्रशासकीय खर्च** | | **निव्वळ नफा/तोटा रु.लक्ष** |
|---|---|---|---|---|
| | | उलाढाली (रुपये लक्ष) | उलाढालीची टक्केवारी | |
| १९९८-९९ | १३१३६.९९ | १६४९.९९ | १२.५४% | (+) ९.११ |
| १९९९-२००० | १४२८१.८९ | १३२५.८९ | ९.२८% | (+) १३.९८ |
| २०००-०१ | १२७५८.४४ | १५९८.१७ | १२.५२% | (+) ९.५० |
| २००१-०२ | १०००६.०५ | १६५०.६० | १६.५०% | (-) ११०.६८ |
| २००२-०३ | १०४९०.९६ | १७३९.४९ | १६.५८% | (-) २७३.५६ |

उपरोक्त तक्त्यावरुन लक्षात येते की, सन १९९८-९९ ते २००२-०३ या कालावधीत महामंडळाचा प्रशासकीय खर्च वार्षिक उलाढालीच्या ९.२८% ते १६.५८% च्या दरम्यान राहिला असून मागील तीन वर्षात खर्चाची टक्केवारी वाढतांना दिसते.

**तक्ता क्र.४.१३**

**एकाधिकार गौण वनौपज खरेदी योजनेअंतर्गत वर्षनिहाय व वनौपजनिहाय अदा करण्यात आलेली सरासरी किंमत**

| अ. क्र. | गौण वनौपजाचे नांव | खरेदीची सरासरी किंमत (प्रति क्विंटल) रुपये | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ |
| १. | हिरडा | ४५२ | ७७४ | ६८१ | ७४७ | ४४० | ४२७ | ४८३ |
| २. | डिंक | ३७८७ | ३७४१ | ३३१४ | ४०३५ | २८०९ | २३५८ | ३२८३ |
| ३. | पळसलाख | - | १४८० | ९०० | - | ७७४ | - | १४२५ |
| ४. | टोळंबी | ६३४ | ५८० | ८५७ | ५९४ | - | ४७४ | ५४७ |
| ५. | मोहाफुले | ४७८ | ४८४ | ५६० | ५८४ | ३३२ | ४७४ | ५१६ |
| ६. | चारोळी | ९७०० | - | ११६५८ | २३१५० | - | ११६९१ | १३२५४ |
| ७. | बिब्बा | - | ४८२ | १८२ | २०५ | - | - | १०० |
| ८. | बेहडा | - | २२१ | १३६ | १०१ | १२२ | ९८ | - |
| ९. | आवळा | - | ७६१ | १३१५ | १६०० | ९०९ | - | ११४५ |
| १० | चिंच | - | ९५६ | - | १०५९ | - | ८५५ | ७८० |
| ११ | शिकेकाई | - | - | ९६३ | - | - | - | २३६० |
| १२ | गवत | - | ८५ | ६५ | ४५ | १०५ | - | १०९ |
| १३ | रिठा | - | ४९५ | - | - | - | - | ४९८ |

आधार :- आदिवासी विकास महामंडळ, नाशिक (वार्षिक प्रशासन अहवाल)

वरील तक्त्याचे निरीक्षण केले असता असे निदर्शनास येते की,

(१) हिरडा व डिंक हे महत्वाचे गौण वनौपजाचे सरासरी भाव १९९७-९८ ते १९९९-२००० या तीन वर्षाच्या तुलनेत सन २०००-०१ ते २००२-०३ या तीन वर्षात कमी झाल्याचे दिसून येते.

(२) बिब्बा व बेहडा या दोन गौण वनौपजाचे किंमतीत १९९७-९८ पासून सतत घट झालेली आहे.

(३) गवताचे किंमतीत सन १९९७-९८ ते १९९९-२००० पेक्षा सन २०००-०१ व २००२-०३ मध्ये थोडी वाढ झालेली आहे.

## तक्ता क्र.४.१४

## सर्वेक्षण करण्यात आलेल्या कुटुंबांचे जमातनिहाय वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | अनुसूचित जमातीचे नांव | कुटुंब संख्या | कुटुंबांतील लोकसख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पुरुष | स्त्री | एकूण |
| १. | ठाणे | डहाणू | वारली | ३० | ६७ | ६४ | १३१ |
| २. | पुणे | खेड | महादेव कोळी | २० | ५१ | ६० | १११ |
| ३. | गडचिरोली | धानोरा | गोंड | ४ | ७ | १० | १७ |
| | | | माडिया गोंड | ८ | १७ | १६ | ३३ |
| | | | परधान | १५ | ३५ | ३५ | ७० |
| | | भामरागड | माडिया | ७ | २० | १७ | ३७ |
| ४. | अमरावती | धारणी | कोरकू | १८ | ४२ | ५३ | ९५ |
| | | | **एकूण** | **१०२** | **२३९** | **२५५** | **४९४** |

सर्वेक्षण करण्यात आलेल्या १०२ कुटुंबामध्ये ठाणे जिल्हयात वारली, जमातीची ३० कुटुंबे, पुणे जिल्हयामध्ये महादेव कोळी जमातीची २० कुटुंबे, अमरावती जिल्हयामध्ये कोरकू जमातीची १८ कुटुंबे तर गडचिरोली जिल्हयामध्ये गोंड व माडिया गोंड जमातीची १२, परधान जमातीची १५ व माडिया या जमातीची ७ कुटुंबांचा समावेश आहे. या १०२ कुटुंबांची एकूण लोकसंख्या ४९५ असून त्यापैकी २४५ पुरुष व २४९ स्त्रिया आहेत.

## तक्ता क्र.४.१५

## सर्वेक्षण करण्यात आलेल्या कुटुंबांचे व्यवसायनिहाय वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंबे | व्यवसायानुसार वर्गीकरण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मुख्य व्यवसाय | | | दुय्यम व्यवसाय | | | |
| | | | | शेती | शेत मजुरी | गौण वनौपज | शेती व गौण वनौपज | शेतमजुरी व गौण वनौपज | गौण वनौपज | एकूण |
| १. | ठाणे | डहाणू | ३० | ६ | २४ | - | १५ | ६ | ९ | ३० |
| २. | पुणे | खेड | २० | २० | - | - | - | ५ | १५ | २० |
| ३. | गडचिरोली | धानोरा | २७ | २४ | २ | १ | - | १ | २६ | २७ |
| | | भामरागड | ७ | ७ | - | - | - | - | ७ | ७ |
| ४. | अमरावती | धारणी | १८ | १८ | - | - | - | - | १८ | १८ |
| | | | **१०२** | **७५** | **२६** | **१** | **१५** | **१२** | **७५** | |
| | | | १००% | ७४% | २५% | १% | १४% | १२% | ७४% | |

सर्वेक्षणात करण्यात आलेल्या १०२ लाभार्थीपैकी ७५ (७४%) लाभार्थींचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. २६ (२५%) लाभार्थींचा/शेतमजुरी हा मुख्य व्यवसाय आहे तर फक्त १ (१%) लाभार्थींचा गौण वनौपज गोळा करणे हा मुख्य व्यवसाय आहे. तर शेती व गौण उत्पादन गोळा करणारे १५ शेतमजुरी व गौण उत्पादन गोळा करणारे १२ व ७५ लाभार्थी गौण उत्पादन गोळा करणे हा दुय्यम व्यवसाय करतात.

**साक्षरता :-**

सर्वेक्षण करण्यात आलेल्या कुटुंबांतील लोकसंख्या तसेच साक्षरता/निरक्षरतेबाबतची माहिती खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र.४१६**

**लोकसंख्येच्या साक्षरता व निरक्षरतेबाबता तक्ता**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कुटुंब संख्या | कुटुंबांतील लोकसख्या | | | कुटुंबांतील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्री | एकूण | साक्षर | | निरक्षर | |
| | | | | | | | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री |
| १. | ठाणे | डहाणू | ३० | ६७ | ६४ | १३१ | ४४ | ३० | २३ | ३४ |
| २. | पुणे | खेड | २० | ५१ | ६० | १११ | ४५ | ५१ | ६ | ९ |
| ३. | गडचिरोली | धानोरा | २७ | ५९ | ६१ | १२० | ४४ | ३७ | १६ | २३ |
| | | भामरागड | ७ | २० | १७ | ३७ | १० | ८ | १० | ९ |
| ४. | अमरावती | धारणी | १८ | ४२ | ५३ | ९५ | ३२ | २७ | १० | २६ |
| | | | **१०२** | **२३९** | **२५५** | **४९४** | **१७५** | **१५३** | **६५** | **१०१** |
| | | **शे.प्रमाण** | **-** | **४८** | **५२** | **१००** | **७३** | **६०** | **२७** | **४०** |

सर्वेक्षण करण्यात आलेल्या १०२ कुटुंबामध्ये ४९४ लोकसंख्या असून, त्यापैकी २३९ (४८%) पुरुष असून २५५ (५२%) स्त्रिया आहेत. २३९ पुरुषापैकी १७५ (७३%) साक्षर पुरुष आहेत, तर २५५ स्त्रिया पैकी १५३ (६०%) स्त्रिया साक्षर आहेत. तर निरक्षरतेचा विचार करता ६५ (२७%) पुरुष निरक्षर तर १०१ (४०%) स्त्रिया निरक्षर असल्याचे दिसून येते.

साक्षर मुला-मुलीची माहिती खालीलप्रमाणे-

**तक्ता क्र.४.१७**

## साक्षर मुलामुलींच्या साक्षरतेबाबतचा तक्ता

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कुटुंबांतील लोकसंख्या | | | साक्षरतेमधील शिकत असलेली | | | शिकत असणाऱ्या मुलांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्री | एकूण | मुले | मुली | एकूण | |
| १. | ठाणे | डहाणू | ४४ | ३० | ७४ | २० | १४ | ३४ | ४६ |
| २. | पुणे | खेड | ४५ | ५१ | ९६ | १४ | १९ | ३३ | ३४ |
| ३. | गडचिरोली | धानोरा | ४४ | ३७ | ८१ | ९ | १० | १९ | २३ |
| | | भामरागड | १० | ८ | १८ | ० | ४ | ४ | २२ |
| ४. | अमरावती | धारणी | ३२ | २७ | ५९ | ९ | ७ | १६ | २७ |
| | | **एकूण** | **१७५** | **१५३** | **३२८** | **५२** | **५४** | **१०६** | **३२** |

एकूण ३२८ साक्षर लोकसंख्येपैकी १०६ (३२%) सध्या शिक्षण घेणारी मुले असून १०६ पैकी ५२ (४९%) मुले व ५४ (५१%) मुली शिकत आहेत. शिक्षण घेत असलेल्या मुले व मुली यांचा जिल्हावार विचार केला असता, सर्वात जास्त ४६ टक्के मुले अमरावती जिल्हयातील धारणी या तालुक्यातील आहेत. तर सर्वात कमी (२२%) मुले गडचिरोली जिल्हयातील भामरागड तालुक्यामधील आहेत.

**तक्ता क्र.४.१८**

## गौण वनौपज गोळा करणाऱ्या कुटुंबाकडील पशुधन

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कुटुंब संख्या | पशुधन | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गाई | बैल | शेळया | म्हैस | कोंबडया | बदके | रेडे | एकूण |
| १. | ठाणे | डहाणू | ३० | १० | १२ | ५ | ० | १२९ | ११ | ० | १६७ |
| २. | पुणे | खेड | २० | १५ | २० | १३ | ६ | १९ | ० | ० | ७३ |
| ३. | गडचिरोली | धानोरा | २७ | ३२ | ३२ | २० | २ | ३१ | ० | २ | ११९ |
| | | भामरागड | ७ | १३ | २७ | २ | ० | ० | ० | ४ | ४६ |
| ४. | अमरावती | धारणी | १८ | ८ | २३ | १५ | ० | ४५ | ० | ० | ९१ |
| | | **एकूण** | **१०२** | **७८** | **११४** | **५५** | **८** | **२२४** | **११** | **६** | **४९६** |

*सर्वेक्षण करण्यात आलेल्या १०२ कुटुंबांचे एकूण पशुधन ४९६ असून त्यामध्ये ८६ (गाई-७८ व म्हैस-८)दुधाळ जनावरे आहेत. बैल व रेडे यांची संख्या १२० आहे. शेळयांची संख्या ५५ असून कोंबडया व बदके यांची एकूण संख्या २३५ आहे. जिल्हावार पशुधनाचा विचार केला असता सर्वात जास्त पशुधन ठाणे जिल्हयात १६७ आहे. त्या खालोखाल १६७ पशुधन गडचिरोली जिल्हयामध्ये असून, सर्वात कमी (७३) पशुधन पुणे जिल्हयामध्ये असल्याचे दिसून येते.*

## तक्ता क्र.४.१९

### वेगवेगळया व्यवसायानुसार उत्पन्नाचे वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कुटुंब संख्या | उत्पन्नाचे साधन | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शेती | शेतमजुरी | इतर मजुरी | जंगल मजुरी | चिकू विक्री | दुय्यम व्यवसाय | गौण वनौपज गोळा करणे मजुरी | गौण वनौपज विक्री | एकूण |
| १. | ठाणे | डहाणू | ३० | ३३,७०० | १,८५,३०० | १०,७०० | ० | १२०० | ० | १५०० | ७६९०० | ३,८९,००० |
| २. | पुणे | खेड | २० | १,२२,५०० | ३१,३०० | ० | ० | ० | १८,२०० | ० | १,८१,४५८ | ३,५३,१५८ |
| ३. | गडचिरोली | धानोरा | २७ | १,४९,००० | २५,२०० | १३,४०० | ५८,००० | ० | ० | ५,१०० | १,६८,३५० | ४,११,०५० |
| | | भामरागड | ७ | ३७,१०० | ० | २,००० | १४,३०० | ० | ० | ० | ४९,८०० | १,०२,९०० |
| ४. | अमरावती | धारणी | १८ | ५६,५०० | ४,००० | ३,००० | ५३,३०० | ० | ० | २,००० | १,२८,४०० | २,४७,२०० |
| | | एकूण | १०२ | ३,९८,८०० | २,४५,५०० | १,०९,१०० | १,२५,३०० | १,२०० | १८,२०० | ८,६०० | ६,०४,९०८ | १५,११,६०८ |
| | | शे.प्रमाण | | २७% | १६% | ७% | ८% | ०% | १% | १% | ४०% | १००% |

सर्वेक्षण करण्यात आलेल्या १०२ लाभधारकांचे वेगवेगळया व्यवसायापासूनचे एकूण उत्पन्न १५,११,६०८ रुपये असून गौण वनौपज विक्री पासून मिळणारे उत्पन्न सर्वात जास्त ६,०४,९०८ (४०%) आहे. त्या खालोखाल शेतीपासून मिळणारे उत्पन्न रु.३,९८,८००, (२७%) शेतमजुरीपासूनचे उत्पन्न रु.२,४५,५०० (१६%), जंगलमजुरीपासूनचे १,२५,३०० (८%) व इतर मंजुरीपासूनचे उत्पन्न १,०९,१०० (७%) आहे. चिकू विक्री, दुग्ध व्यवसाय व गौण वनौपज गोळा करण्याची मजुरीपासूनचे उत्पन्न नगण्य असल्याचे दिसून येते.

# प्रकरण ५

## अडचणी व शिफारशी

***अडचणी :- गौण वनौपज खरेदी योजना राबविताना योजना अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना येणाऱ्या अडचणी***

***(१) ग्राम विकास विभागाकडून मुदतवाढ मिळण्यास विलंब***

*सन १९७६ च्या कायद्यान्वये राज्याच्या आदिवासी भागात एकाधिकार खरेदी योजना राबविण्यासाठी शासनाने आदिवासी विकास महामंडळाची स्थापना केली असून त्यानुसार दरवर्षी गौण वनौपजांच्या हंगामात आदिवासी विकास महामंडळामार्फत राज्यातील विविध खरेदी केंद्रावर गौण वनौपजांची खरेदी करण्यात यते. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४५ अन्वये गौण वनौपजांचे अधिकार संबंधित ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करण्यात आले आहेत. त्यामुळे अनुसूचित क्षेत्रात गौण वनौपज मालाची आदिवासी शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यासाठी आदिवासी विकास महामंडळाला प्रत्येक हंगामात ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून मुदतवाढ/परवानगी घ्यावी लागत आहे. प्रत्येक हंगामात सदर परवानगी मिळण्यास खूप उशीर होतो. ज्यामुळे वनौपज खरेदी वेळेत सुरु करण्यास अडचण निर्माण होते. त्याचा विपरित परिणाम वनौपज खरेदीवर होतो.*

***(२) वनक्षेत्रातील गौण वनौपज वाहतूक करण्यास पास मिळण्यास विलंब***

*आदिवासी विकास महामंडळाने खरेदी केलेले गौण वनौपज,खरेदी केंद्रावरुन मध्यवर्ती गोदामाकडे वाहतूकीद्वारे पाठवावे लागते. महामंडळाची खरेदी केंद्रे वन विभागाच्या हद्दीत असल्याने सदर गौण वनोपज माल वाहतूकीसाठी आदिवासी विकास महामंडळाला दरवेळी वन विभागाकडून वाहतूक पास घ्यावा लागतो. वाहतूक पास घेण्यासाठी वन विभागाने विशिष्ट पध्दत ठरवून दिलेली असल्याने प्रत्येक वेळी अनेक बाबींची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गौण वनौपज वाहतूक करण्यासाठी अडचणी येतात व पर्यायाने विलंब होतो.*

***(३) खरेदीच्या हमी भावापेक्षाही विक्री किंमत कमी***

*आदिवासी विकास महमंडळाकडे हिरडा, मोहाफुले, डिंक इ.मालाची मोठया प्रमाणात खरेदी केली जाते. त्यासाठी आदिवासी कास्तकारांना महामंडळाने ठरवून दिलेल्या हमी भावाने किंमत द्यावी लागते. नंतर खरेदी केलेले गौण वनौपज तालुक्याच्या ठिकाणी आणून जाहीर लिलावाद्वारे त्याची विक्री केली जाते. त्यासाठी वर्तमानपत्रातून जाहिरात देण्यात येते. बऱ्याचदा बोली लावण्यासाठी आलेले व्यापारी आपआपसात एकी करुन वनौपजाचा दर कमी ठेवतात. त्यामुळे प्रत्यक्ष लिलावाच्या वेळी भाव वाढवून व्यापारी बोली लावत नाही. त्यामुळे अनेकदा खरेदीच्या हमी भावाइतकी विक्री किंमत*

येत नाही. त्यामुळे लिलाव रद्द करावा लागतो. अशा प्रकारामुळे महामंडळाकडील गोदामात गौण वनौपजांचा शिल्लक साठा वाढत जातो. पर्यायाने सदर मालामध्ये मोठया प्रमाणात महामंडळाची गुंतवणूक अडकून पडते. मागील दोन वर्षात जुन्नर येथील लिलावात हा अनुभव आल्याने महामंडळाने खरेदी केलेला हिरडा मोठया प्रमाणात गोदामात शिल्लक ठेवला आहे. नवीन हंगाम सुरु झाल्यानंतर खरेदीचा भाव वाढवून मिळावा, अशी आदिवासी कास्तकारांची मागणी असते. परंतू आधीच्या हंगामात खरेदी केलेला हिरडा विक्री अभावी गोदामात पडून राहिल्याने खरेदीच्या हमी भावात वाढ करणे महामंडळाला शक्य होत नाही.

**(४) कर्जापोटी घ्याव्या लागणाऱ्या व्याजामुळे कास्तकारांना योग्य भाव मिळत नाही.**

सध्या आदिवासी विकास महामंडळ, आदिवासी कास्तकारांनी गोळा केलेली गौण वनौपजे खरेदी करण्यासाठी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून, गोदामात शिल्लक असलेल्या गौण वनौपजांच्या साठयांवर नजर गहाण कर्ज (हुंडी) घेऊन, त्या आधारे आदिवासी कास्तकारांकडून खरेदी केलेल्या गौण वनौपजांची बिले अदा करतात. नजर गहाण कर्जापोटी महामंडळाला, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला घेतलेल्या नजर गहाण कर्जापोटी मोठया प्रमाणात व्याजाच्या रक्कम अदा कराव्या लागतात. त्यामुळे आदिवासी कास्तकारांना भाव वाढवून देता येत नाही.

**(५) आदिवासी सहकारी संस्थाकडून भाडयाने घेण्यात आलेल्या गोदामात सुविधांचा अभाव**

एकाधिकार गौण वनौपज खरेदी योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेली गौण वनौपज साठविण्यासाठी, अनेक ठिकाणी विविध कार्यकारी आदिवासी सहकारी संस्थांनी बांधलेली गोदामे, महामंडळाने भाडयाने घेतलेली असून, गोदामाच्या वापराबद्दल सहकारी संस्थांना भाडे देण्यात येते. अशाप्रकारची बरीच गोदामे खूप जुनी झाली असल्याने मिळणाऱ्या भाडयाच्या रक्कमेत देखभालीचा खर्च देखील भागत नाही. दुसरे असे की, काही खरेदी केंद्रावर गोदामांची पुरेशी सुविधा नाहीत. त्यामुळे गौण वनौपज माल साठविण्यास अनेक अडचणी येतात.

**(६) खरेदी केंद्रावर मालाची प्रतवारी करण्याची अडचण**

गौण वनौपज खरेदी केंद्रावर महामंडळाच्या कर्मचाऱ्यांकडून मालाची खरेदी केली जाते. महामंडळाच्या केंद्रावर प्राप्त होणाऱ्या मालाची प्रतवारी करण्यासाठी तसेच प्रतवारी केलेला माल वेगवेगळा साठविण्यासाठी प्रशिक्षित तसेच पुरेसे कर्मचारी नसल्याने जागेवर मालाची प्रतवारी करता येत नाही व माल एकत्रित साठवून ठेवावा लागतो. या मालाची विक्री होताना प्रतवारी झालेली नसल्याने चांगली किंमत येण्यास अनेक अडचणी निर्माण होतात.

## (७) गौण वनौपजवर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचा अभाव

महामंडळामार्फत आदिवासी भागात हिरडा, मोहाफुले, डिंक तसेच इतर अनेक गौण वनौपजांची मोठया प्रमाणावर खरेदी केली जाते व ही गौण वनौपजे इतर उद्योगांना लागणारा कच्चा माल म्हणून जाहीर लिलावात विकली जातात. राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात सध्या तरी गौण वनौपजांवर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे आस्तित्वात नाहीत. कारण सदर उद्योगांसाठी मोठया प्रमाणावर गुंतवणूक आवश्यक असल्याने असे उद्योग सुरु करणे महामंडळास परवडत नाही. त्यामुळे गोळा केलेली गौण वनौपजे एकत्रितरित्या कच्चामाल म्हणून जाहीर लिलावाने विकण्याखेरीज मंडळापुढे पर्याय शिल्लक राहत नाही.

## शिफारशी :-

क्षेत्रीय पाहणीमध्ये आढळलेल्या बाबी तसेच योजना अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांशी केलेली चर्चा यामधून काही निष्कर्ष काढण्यात आलेले असून त्याआधारे खालील शिफारशी करण्यात येत आहेत.

### (१) गौण वनौपज उत्पादन कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी -

सदर कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी वन विभाग तसेच आदिवासी विकास महामंडळातर्फे झाल्यास गौण वनौपज खरेदी विक्री प्रक्रियेमधील खाजगी कंत्राटदार तसेच व्यापारी यांचा हस्तक्षेप कमी होण्यास मदत होईल.

एकाधिकार खरेदी योजनेतील कार्यक्षेत्रात उत्पादित होणाऱ्या गौण वनौपजांच्या सर्व वस्तुंवर लक्ष ठेवून त्याची खरेदी करण्याची कार्यवाही कटाक्षाने राबविणे आवश्यक वाटते.

### (२) गौण वनौपज साठवणूक सुविधा :-

सध्या महाराष्ट्र आदिवासी विकास महामंडळ, नासिक यांनी खरेदी केलेली गौण वनौपज साठविण्याकरिता विविध कार्यकारी संस्थाची गोदाम वापरत असून या गोदामांच्या देखभालीवर लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच महामंडळाने भविष्यात स्वत:च्या साठवणूक सुविधा निर्माण करण्याबाबत लक्ष पुरविणे आवश्यक वाटते. त्यासाठी गोदामांच्या बांधकामासाठी वेगळा निधी उपलब्ध झाल्यास साठवणुकीबाबतची अडचण दूर होऊ शकेल, असे वाटते.

### (३) आदिवासी कास्तकारांनी गोळा केलेल्या गौण वनौपजासाठी योग्य किंमत :-

कास्तकारांना योग्य किंमत मिळाल्यास गौण वनौपज संकलन करणे या पूरक व्यवसायात आदिवासींचा सहभाग वाढू शकेल. यासाठी कास्तकारांनी गोळा केलेल्या वनौपजांची प्रतवारी करणे व प्रतवारीनुसार किंमत देणे, आदिवासींना गौण वनौपज संकलन करण्याबाबत प्रशिक्षण देणे इ.उपक्रम महामंडळामार्फत राबविणे इष्ट होईल.

## (४) गौण वनौपजांवर प्रक्रिया :-

आदिवासी कास्तकारांकडून खरेदी झालेली गौण वनौपजे कोणतीही प्रक्रिया न करता खुल्या बाजारात व्यापारांना विकण्यात येतात. महामंडळाने याबाबत आदिवासी उपयोजना क्षेत्रात गौण वनौपजावर प्रक्रिया करणारे उद्योग स्थापन करणे शक्य आहे किंवा कसे याबाबत शक्यता अजमावणे आवश्क आहे. असे उद्योग सुरु झाल्यास आदिवासी कास्ताकारांना त्यात रोजगाराची संधी मिळू शकेल. त्याचप्रमाणे गौणवनौपज संकलित करणाऱ्या आदिवासी कास्तकारांना योग्य मोबदला मिळण्यास मदत होईल.

## (५) गौण वनौपज देणाऱ्या वृक्षांची नवीन लागवड :-

गौण वनौपज देणाऱ्या नवीन वृक्षांची लागवड वन क्षेत्रात झाल्यास गौण वनौपजाचे उत्पादन वाढण्यास मदत होऊ शकेल. तसेच त्यामुळे आदिवासी कास्तकारांना मिळणाऱ्या मोबदल्यात भविष्यात वाढ होऊ शकेल.

## (६) गौण वनौपज खरेदी करण्याच्या हंगामापूर्वी खरेदी केंद्रास परवानगी देणे :-

सन १९७६ च्या कायद्याने राज्याच्या आदिवासी भागात गौण वनौपज एकाधिकार खरेदी योजना राबविण्यासाठी, शासनाने आदिवासी विकास महामंडळाची स्थापना केलेली असून, त्यानुसार महामंडळाच्या खरेदी केंद्रावर गौण वनौपज हंगामात आदिवासी कास्तकारांकडून संकलित केलेल्या वनौपजाची खरेदी करण्यात येते. परंतू सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४५ न्वये गौण वनौपजांचे खरेदी अधिकार संबंधित ग्रामपंचायतींना हस्तांतरीत करण्यात आले आहेत. त्यामुळे प्रत्येक हंगामात आदिवासी विकास माहमंडळाला ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून मुदतवाढ/परवानगी घ्यावी लागते. आजपर्यंतच्या महामंडळाच्या अनुभवानुसार प्रत्येक हंगामात सदर परवानगी मिळण्यास खूप उशीर होतो. त्यामुळे वनौपज खरेदी वेळेत सुरु करण्यास अडचण निर्माण होते. त्यामुळे गौण वनौपज खरेदीवर विपरीत परिणाम होतो. त्याकरिता शासन स्तरावरुन ग्राम विकास विभगाला प्रत्येक हंगाम सुरु होण्यापूर्वी मुदतवाढ देण्याबाबतच्या सूचना निर्गमित करणे आवश्यक आहे. जेणेकरुन आदिवासी विकास महामंडळास विहित कालावधीत मुदतवाढ/परवानगी मिळाल्याने खरेदी प्रक्रिया सुरु करण्यास होणारा विलंब भविष्यात टळू शकेल.

## (७) वनविभागाकडून वाहतूक पास देण्यास लागणाऱ्या विलंबाबाबत

आदिवासी विकास महामंडळाला गौण वनौपजाची वाहतूक करताना वन विभागाकडून वाहतूक पास घ्यावा लागतो. वाहतूक पास मिळविण्याच्या कामात अनेक बाबींची पूर्तता करावी लागते. त्यामुळे विलंब होतो. याबाबत शासन स्तरावरुन वन विभागाशी संपर्क साधून महामंडळाला देण्यात येणारे वाहतूक पास यासंबंधी सोपी पध्दती सुरु करण्यात यावी. जेणेकरुन पास मिळण्यासाठी होणारा विलंब टळून गौण वनौपजांची वाहतूक कमी वेळात करणे शक्य होईल.

## (८) गौण वनौपज पासून औषधे व इतर वस्तु तयार करण्याचे उद्योग सुरु करणे

आदिवासी उपयोजना क्षेत्रात सापडणारी बरीच गौण वनौपज उद्योगधंद्यात कच्चामाल म्हणून वापरण्यात येतात. तसेच त्यापासून अनेक औषधे बनविण्यात येतात. मागील काही वर्षाचा अनुभव पाहता तालुका पातळीवर आदिवासी विकास महामंडळाच्या गोदामात गौण वनौपजांचा मोठया प्रमाणात साठा शिल्लक राहत असल्याने तालुका पातळीवर सहकारी तत्वावर अशाप्रकारचे उद्योग सुरु करण्यास शासनातर्फे उद्योजकांना बीज भांडवल उपलब्ध झाल्यास आदिवासी युवकांना अशा उद्योगात रोजगार उपलब्ध होण्यास मदत होऊ शकेल.

## (९) खरेदी केंद्रावर कर्मचाऱ्यांचा अभाव :-

क्षेत्रीय पाहणीत खरेदी केंद्रावर शेती उत्पादने तसेच गौण वनौपजे एकाच ठिकाणी खरेदी करण्यात येत असल्याचे आढळले. तसेच मालाची प्रतवारी वेगवेगळी करुन साठविण्यासाठी महामंडळाच्या केंद्रावर वेगवेगळे कर्मचारी नसल्याचे आढळले. याबाबत पुरेसे कर्मचारी नेमण्याची आवश्यकता वाटते.

## (१०) निधीची कमतरता :-

गौण वनौपज खरेदी विक्रीच्या कामात विविध कार्यकारी आदिवासी सहकारी सोसायटयाचा सहभाग मोठा असून, आदिवासी विकास महामंडळाला, या कामात त्याची मोठी मदत होत आहे. क्षेत्रीय पाहणीत सदर सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांशी केलेल्या चर्चेत असे आढळून आले की या संस्थांना, सतत निधीची कमतरता भासत असून त्यांच्या सशक्तीकरणासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

## (११) गौण वनौपज खरेदीकरिता वेगळा निधी उपलब्ध करुन देणे :-

आदिवासी कास्तकारांनी गोळा केलेल्या गौण वनौपज महामंडळाच्या खरेदी केंद्रावर खरेदी केल्यानंतर आदिवासी कास्तकारांना त्यांची किंमत त्वरीत अदा करावी लागते. यासाठी महामंडळाला निधीची आवश्यकता असते. यासाठी गोदामात शिल्लक असलेल्या साठयावर महाराष्ट्र राज्य सहकारी विकास बँकेकडून नजरगहाण, कर्ज घेण्यात (हुंडी) येते. त्यामुळे महामंडळाला सदर बँकेला मोठया प्रमाणात व्याज द्यावे लागते. यासाठी महामंडळाला **खरेदी कामाकरिता वेगळा निधी उपलब्ध करुन दिल्यास सोयीचे होईल, असे वाटते.**

* * *

# प्रकरण क्र. ६

## निष्कर्ष

गौण वनौपज गोळा करणे, विक्री करणे यापासून आदिवासींना मिळणारे उत्पन्न, वनौपज खरेदी करण्याकरिता आदिवासीं विकास महामंडळाकडून करण्यात येत असलेली कार्यवाही, या बाबींची पाहणी केल्यानंतर आढळून आलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

### (१) जंगलतोडीमुळे गौण उत्पन्नावर होणारा परिणाम

पाहणीत असे निदर्शनास येते की, सन १९९८-९९ या वर्षी झालेले एकूण उत्पन्न ९६,९४२ क्विंटल होते. उत्पन्न कमी होऊन सन २००२-०३ या वर्षी ५०,९०७ क्विंटल झाले आहे. म्हणजे ४६,०३५ क्विंटलने उत्पन्नात घट झालेली आहे. **उत्पन्नात घट होण्याचे महत्वाचे कारण जंगलतोड हेच आहे.** वनौपजाचे उत्पन्न वाढविण्यासाठी जंगल तोडीवर प्रतिबंध घालून जंगलतोड बंद करणे आवश्यक आहे.

### (२) रोजगार निर्मिती

गौण वनौपजामुळे आदिवासी कुटुंबांना रोजगार मिळतो. १९९७-९८ यावर्षी ९५,१८७ लाभधारकांना गौण वनौपजामुळे रोजगार मिळून फायदा झालेला आहे. जंगलतोड व इतर अनेक कारणामुळे वनौपजाच्या उत्पन्नात घट झालेली आहे. १९९८-९९ नंतर वनौपजाचे उत्पन्नात घट होऊन २००२-०३ मध्ये ४३,७८५ लाभधारकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. म्हणजे ५१,४०२ ने रोजगार निर्मिती कमी झाली आहे. जंगलतोडीमुळे वनौपजाची निर्मिती, कमी होत आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीमध्ये घट झाल्याचे दिसून आले आहे.

### (३) वनौपजास मिळणारा मोबदला

वनौपज गोळा केल्यानंतर लाभधारकांना योग्य किंमत मिळावी म्हणून आदिवासी विकास महामंडळातर्फे एकाधिकार गौण खरेदी योजना राबविण्यात येते. पाहणीत वनौपजाच्या सरासरी खरेदी किंमतीचा विचार केल्यास हिरडा **वनौपजाची किंमत कमी होत असल्याचे निदर्शनास येते.** १९९७-९८ यावर्षी रु.७७४/- प्रति क्विंटल तर २००२-०३ यावर्षी रु.४८३/- प्रति क्विंटल तसेच डिंक, टोळंबी, बिब्बा, बेहडा, चिंच या वनौपजांची किंमत कमी होत असल्याचे तक्ता क्र.४.९ वरुन दिसून येते.

### (४) लाभधारकास मिळणारा मोबदला

गौण वनौपज गोळा करणाच्या कामात एका व्यक्तीला साधारणपणे ७० ते ९० रुपये इतका मोबदला मिळतो. आदिवासी कास्तकारांना वर्षामध्ये साधारणपणे ४ ते ५ महिने काम मिळते.

## (५) वनौपजाचा उपयोग

*वनौपजाचा उपयोग विविध विकारावरील औषधे तयार करण्यासाठी केला जातो. वनौपज गोळा केल्यानंतर त्याला मिळणारी किंमत व वनौपजावर प्रक्रिया करुन विकला जाणाऱ्या किंमतीमध्ये फार मोठी तफावत आढळून येते. वनौपजाचा उपयोग त्यावर प्रक्रिया करुन केल्यास आदिवासी व सर्वसामान्य जनतेला चांगला फायदा होईल.*

## (६) शासकीय व अशासकीय संघटनामार्फत होणारा आदिवासींचा विकास

*वनौपज गोळा केल्यानंतर आदिवासी लाभधारकांना योग्य किंमत मिळावी म्हणून शासनामार्फत आदिवासी विकास महामंडळाकडून वनौपज एकाधिकार खरेदी योजना आणि विविध कार्यकारी सहकारी सोसायटयामार्फतही वनौपज खरेदी करुन आदिवासी लाभधारकास मदत करण्यात येते. तसेच अशासकीय संघटनेद्वारे आदिवासींच्या विकासासाठी मदत करण्यात येत आहे.*

* * *

परिशिष्ट-१

महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय वनक्षेत्र दर्शविणारा नक्शा

सन २००२-०३ (अस्थायी) वनक्षेत्र चौ.कि.मी.

| अ.क्र. | जिल्हा | विभाग | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वने | ० | ० | ० | ० |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| २ | मुंबई उपनगर | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वन | १३ | ० | ३१ | ४४ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१३** | **०** | **३१** | **४४** |
| ३ | ठाणे | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वन | २४१३ | ९५९ | ४ | ३३७६ |
| | | एफडीसीएम | ४६६ | ० | ० | ४६६ |
| | | **एकूण** | **२८७९** | **९५९** | **४** | **३८४२** |
| ४ | रायगड | महसूल | १५ | ४१ | ० | ५६ |
| | | वन | १३९६ | १३१ | १६४ | १६९१ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१४११** | **१७२** | **१६४** | **१७४७** |
| ५ | रत्नागिरी | महसूल | ० | ० | २ | २ |
| | | वन | १३ | ० | ४९ | ६२ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१३** | **०** | **५१** | **६४** |
| ६ | सिंधुदुर्ग | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वन | १६५ | ० | ३९२ | ५५७ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१६५** | **०** | **३९२** | **५५७** |
| ७ | नाशिक | महसूल | ४५ | ० | ० | ४५ |
| | | वने | २९६८ | २४४ | १२ | ३२२४ |
| | | एफडीसीएम | १६१ | ० | ० | १६१ |
| | | **एकूण** | **३१७४** | **२४४** | **१२** | **३४३०** |
| ८ | धुळे | महसूल | १६५ | ० | ० | १६५ |
| | | वन | १८५४ | ४ | ० | १८५८ |
| | | एफडीसीएम | २८ | ० | ० | २८ |
| | | **एकूण** | **२०४७** | **४** | **०** | **२०५१** |

| अ.क्र. | जिल्हा | विभाग | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | नंदूरबार | महसूल | १५ | ० | ० | १५ |
| | | वन | १९५७ | ४७ | १६३ | २१६७ |
| | | एफडीसीएम | २१० | ० | ० | २१० |
| | | **एकूण** | **२१८२** | **४७** | **१६३** | **२३९२** |
| १० | जळगांव | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वने | १७४६ | १९ | ० | १७६५ |
| | | एफडीसीएम | २२६ | ० | ० | २२६ |
| | | **एकूण** | **१९७२** | **१९** | **०** | **१९९१** |
| ११ | अहमदनगर | महसूल | ५४७ | ० | ३ | ५५० |
| | | वन | १३७७ | १४ | ५३ | १४४४ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१९२४** | **१४** | **५६** | **१९९४** |
| १२ | पुणे | महसूल | ३०० | ० | ० | ३०० |
| | | वन | १५१९ | ० | २६१ | १७८० |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१८१९** | **०** | **२६१** | **२०८०** |
| १३ | सातारा | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वने | १३८७ | ४८ | १०७ | १५४२ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१३८७** | **४८** | **१०७** | **१५४२** |
| १४ | सांगली | महसूल | ९५ | ० | ८ | १०३ |
| | | वन | ३७९ | २ | २६ | ४०७ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **४७४** | **२** | **३४** | **५१०** |
| १५ | सोलापूर | महसूल | १६५ | ० | १ | १६६ |
| | | वन | १७९ | ० | १३ | १९२ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **३४४** | **०** | **१४** | **३५८** |
| १६ | कोल्हापूर | महसूल | १ | १ | १ | ३ |
| | | वन | ६३२ | ४१६ | ६९१ | १७३९ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **६३३** | **४१७** | **६९२** | **१७४२** |
| १७ | औरंगाबाद | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वन | ८१९ | २२ | ५९ | ९०० |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **८१९** | **२२** | **५९** | **९००** |

| अ.क्र. | जिल्हा | विभाग | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ | जालना | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वन | ७९ | २ | १८ | ९९ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **७९** | **२** | **१८** | **९९** |
| १९ | नांदेड | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वन | १०६० | ३ | २१८ | १२८१ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१०६०** | **३** | **२१८** | **१२८१** |
| २० | परभणी | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वन | ८२ | ० | १७ | ९९ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **८२** | **०** | **१७** | **९९** |
| २१ | हिंगोली | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वन | २५२ | ० | २३ | २७५ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **२५२** | **०** | **२३** | **२७५** |
| २२ | बिड | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वन | १९९ | १७ | २४ | २४० |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१९९** | **१७** | **२४** | **२४०** |
| २३ | उस्मानाबाद | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वन | ३१ | ० | ३० | ६१ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **३१** | **०** | **३०** | **६१** |
| २४ | लातूर | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वन | ३ | ० | ३७ | ४० |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **३** | **०** | **३७** | **४०** |
| २५ | बुलढाणा | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वन | १०६५ | १०० | ० | ११६५ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१०६५** | **१००** | **०** | **११६५** |

| अ.क्र. | जिल्हा | विभाग | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| २६ | अकोला | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वने | ४५२ | १५ | १ | ४६८ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **४५२** | **१५** | **१** | **४६८** |
| २७ | वाशिम | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वन | ३१९ | १ | ० | ३२० |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **३१९** | **१** | **०** | **३२०** |
| २८ | अमरावती | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वन | ३४९२ | १० | ० | ३५०२ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **३४९२** | **१०** | **०** | **३५०२** |
| २९ | यवतमाळ | महसूल | ० | ० | ० | ० |
| | | वने | २७८२ | १७४ | ० | २९५६ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **२७८२** | **१७४** | **०** | **२९५६** |
| ३० | वर्धा | महसूल | ० | ० | २८ | २८ |
| | | वन | ५१९ | ३३८ | १६२ | १०१९ |
| | | एफडीसीएम | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **५१९** | **३३८** | **१९०** | **१०४७** |
| ३१ | नागपूर | महसूल | ० | ० | १९१ | १९१ |
| | | वन | ११४८ | ७०६ | ३२६ | २१८० |
| | | एफडीसीएम | २७१ | १२३ | ० | ३९४ |
| | | **एकूण** | **१४१९** | **८२९** | **५१७** | **२७६५** |
| ३२ | भंडारा | महसूल | ० | ० | १३५ | १३५ |
| | | वन | ५८२ | ३१६ | १८४ | १०८२ |
| | | एफडीसीएम | ३०० | ० | ० | ३०० |
| | | **एकूण** | **८८२** | **३१६** | **३१९** | **१५१७** |
| ३३ | गोंदिया | महसूल | ० | ० | ४४४ | ४४४ |
| | | वन | १०७७ | ७८३ | २०९ | २०६९ |
| | | एफडीसीएम | ३२० | ० | ० | ३२० |
| | | **एकूण** | **१३९७** | **७८३** | **६५३** | **२८३३** |
